शुक्रवार, 04 नोव्हेंबर 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक -86
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● FRIDAY 04 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-86 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

# भ्रष्टाचाऱ्यांना संरक्षण मिळता कामा नये

## पंतप्रधान नरेंद्र मोदी : नव्या तक्रार यंत्रणेचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : भ्रष्टाचाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण, सूट मिळता कामा नये. त्यांना कोणतेही राजकीय किंवा सामाजिक संरक्षण मिळता कामा नये. शिवाय भ्रष्टाचाराला खतपाणी घालणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांविरोधात शिस्तभंगाची कारवाई करण्यासंदर्भातली प्रक्रिया आपण आता निश्चित करायला हवी, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.**

गेल्या कित्येक वर्षांमध्ये भारतातील भ्रष्टाचाराची समस्या सुटू शकलेली नाही. केंद्रीय आणि राज्य पातळीवर सरकारे बदलल्यानंतरही ही समस्या मात्र तशीच राहिल्यामुळे त्यावर तोडगा काढण्यासाठी व्यवस्थेमध्येच अमूलाग्र बदल करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी गुरुवारी दिल्लीच्या विज्ञान भवनमध्ये भ्रष्टाचाराविरोधात तक्रार दाखल करण्यासाठी केंद्रीय दक्षता आयोगाच्या नव्या वेबसाईटचे उद्घाटन केले. भ्रष्टाचाऱ्यांविरोधात कठोर कारवाई होण्याची गरज यावेळी पंतप्रधानांनी व्यक्त केली.

**दक्षता सप्ताहाचे आयोजन :** केंद्रीय दक्षता आयोगाकडून भ्रष्टाचारविरोधी मोहिमेचा भाग म्हणून ३१ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर या कालावधीमध्ये दक्षता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. जनतेमध्ये भ्रष्टाचारविरोधी जनजागृती करण्यासाठी 'विकसित देश होण्यासाठी भ्रष्टाचारमुक्त भारत' या थीमवर आधारित उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

### भ्रष्टाचार एक वाईट प्रवृत्ती आहे

भ्रष्टाचार ही एक वाईट प्रवृत्ती असून तिच्यापासून सगळ्यांनी दूर राहायला हवे. गेल्या आठ वर्षांत आम्ही ही संपूर्ण व्यवस्था 'अभाव' आणि 'दबाव' यापासून स्वतंत्र करण्याचा प्रयत्न करत आहोत", असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले. "विकसित भारतात प्रशासकीय व्यवस्थेमध्ये भ्रष्टाचार अजिबात चालवून घेतला जायला नको", असंही मोदींनी स्पष्ट केले आहे. मोदींनी यावेळी उद्घाटन केलेल्या सीव्हीसीच्या नव्या संकेतस्थळावर नागरिकांना भ्रष्टाचाराविरोधातील त्यांच्या तक्रारी दाखल करता येणार आहेत. तसेच, अगदी सोप्या पद्धतीने त्यांच्या तक्रारींवर काय कार्यवाही करण्यात आली, तेही पाहाता येणार आहे.

## महाराष्ट्रासाठी २ लाख कोटींचे २२५ प्रकल्प मंजूर



महाराष्ट्रात २ लाख कोटींचे २२५ प्रकल्प मंजूर करण्यात आले असल्याची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. मुंबईत रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला असून यावेळी नियुक्तीपत्रांचे वाटप करण्यात आले. यावेळी नरेंद्र मोदींनी संवाद साधत महाराष्ट्रात भविष्यात तरुणांसाठी रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होतील असा विश्वास व्यक्त केला. स्टार्टअप, लघु उद्योगांना संभाव्य आर्थिक मदत सरकार देत आहे. जेणेकरुन तरुणांना आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळेल. सरकारच्या प्रयत्नांमधून रोजगाराच्या संधी दलित, आदिवासी, महिलांना समान स्वरुपात उपलब्ध होत आहे, अशी माहिती नरेंद्र मोदी यांनी दिली. गेल्या आठ वर्षात ८ कोटी महिला सेल्फ हेल्प ग्रुपशी जोडल्या गेल्या आहेत. त्यांना साडे पाच लाख कोटींची मदत देण्यात आली आहे. या ग्रुपशी जोडलेल्या महिला इतर महिलांनाही रोजगार देत आहेत, असे मोदींनी सांगितले. आज देशभरात पायाभूत सुविधा, माहिती-तंत्रज्ञान आणि इतर क्षेत्रांमध्ये सरकार मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहे. यामुळे रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत आहेत. महाराष्ट्रात २ लाख कोटींपेक्षा जास्त २२५ प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. या प्रकल्पांवर काम सुरु आहे किंवा सुरु होत आहे. महाराष्ट्रात रेल्वेसाठी ७५ हजार कोटी आणि रस्ते विकास प्रकल्पासाठी ५० हजार कोटींचा निधी देण्यात आला आहे, अशी माहिती मोदींनी दिली. केंद्र सरकार पायाभूत सुविधांवर खर्च करत असताना त्यातून रोजगाराच्या लाखो संधी निर्माण होतात. भविष्यात महाराष्ट्रात तरुणांसाठी रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होतील, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला.

### महत्वाची बातमी

## दहशतवादी मोहम्मद आरिफची फाशी कायम

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** २००० साली दिल्लीच्या लाल किल्ल्यावर झालेल्या हल्ला प्रकरणात लष्कर-ए-तोयबाचा दहशतवादी मोहम्मद आरिफ ऊर्फ अश्फाकला सर्वोच्च न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली आहे. फाशीच्या शिक्षेविरोधात दाखल आरिफची पुनर्विचार याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. सरन्यायाधीश उदय लळीत आणि न्यायमूर्ती बेला एम त्रिवेदी यांच्या खंडपीठाने ही शिक्षा ठोठावली आहे. इलेक्ट्रॉनिक नोंदी विचारात घेण्याची विनंती आम्ही मान्य केली होती. दरम्यान, आरिफ या प्रकरणात दोषी आढळला आहे. त्यामुळे त्याची पुनर्विचार याचिका फेटाळत आहोत, असे न्यायमूर्तींनी म्हटले आहे. २२ डिसेंबर २००० मध्ये लाल किल्ल्यावर झालेल्या हल्ल्यात दोन जवानांसह तिघांचा मृत्यू झाला होता. १० ऑगस्ट २०११ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने आरिफची फाशीची शिक्षा कायम ठेवली होती. २००५ मध्ये सत्र न्यायालयाने ठोठावलेल्या फाशीच्या शिक्षेला आव्हान देणारी त्याची याचिकाही न्यायालयाने फेटाळली होती. त्यानंतर २०१४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने या शिक्षेच्या अंमलबजावणीला स्थगिती दिली होती. आरिफ मुळचा पाकिस्तानातील अबोटाबादमधील रहिवासी आहे. त्याने लाल किल्ल्यावर राजपुताना रायफलसच्या सातव्या तुकडीवर अंदाधुंद गोळीबार केला होता.

## इम्रान खानवर जीवघेणा हल्ला

आधुनिक केसरी न्यूज




**इस्लामाबाद :** लाँग मार्च घेऊन इस्लामाबादच्या दिशेने निघालेले पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्यावर गुजरावाला येथील अल्लाहवाला चौकात हल्ला करण्यात आला. समर्थकांना संबोधित करत असताना एका व्यक्तीने त्याच्या कंटेनरवर गोळीबार केला. गोळीबाराच्या आवाजाने रॅलीमध्ये एकच खळबळ उडाली. या हल्ल्यात अनेक जण जखमी झाले. हल्लेखोराने कंटेनरच्या खालून वरच्या दिशेने गोळीबार केल्याने पीटीआयचे नेते इम्रान खान यांच्या पायाला गोळी लागली. हल्लेखोर व्यक्तीने अनेक गोळ्या झाड्ल्या. या गोळीबारात इम्रान खानसह अनेक जण जखमी झाले. या बाबत प्रसारित झालेल्या वृत्तानुसार, इम्रान खानच्या पायात गोळी लागल्यानंतर त्यांना बुलेटप्रूफ कारमधून रुग्णालयात नेण्यात आले होते. सध्या हल्लेखोराला अटक करण्यात आली आहे. पाकिस्तानी न्यूज वेबसाइट जिओ न्यूजने दिलेल्या वृत्तानुसार, हल्लेखोर इम्रान खान यांच्या ताफ्याची वाट पाहत होता. ते कंटेनरच्या अगदी जवळ होते. कंटेनर जवळ येताच त्याने त्याच्या वर उभ्या असलेल्या इम्रान खान आणि त्यांच्या पक्षाच्या नेत्यांवर हल्ला चढवला. खालून झालेल्या हल्ल्यामुळे कंटेनरच्या वर उभ्या असलेल्या इम्रान खान यांच्या पायाला गोळ्या लागल्या. इम्रानला कंटेनरमधून उतरवताना त्यांच्या पायाला पट्टी बांधण्यात आली होती. जिओ न्यूजनुसार या हल्ल्यात फवाद चौधरी आणि फैसल जावेद हे देखील जखमी झाले आहेत. पीटीआयचे अध्यक्ष इम्रान खान हे इस्लामाबादच्या दिशेने निघालेल्या सरकारविरोधी मोर्चाचे नेतृत्व करत आहेत. त्यांनी या हल्ल्यापूर्वी यापूर्वी सांगितले की, निवडणुकीची तारीख जाहीर होईपर्यंत १० महिने आमचा विरोध सुरू राहील. द न्यूजने दिलेल्या वृत्तानुसार, योजना ४ नोव्हेंबरपर्यंत फेडरल कॅपिटलमध्ये पोहोचण्याची होती, नंतर ८-९ नोव्हेंबर आणि नंतर ११ नोव्हेंबरपर्यंत तीत सुधारणा केली गेली. इम्रान खान यांचा हा लाँग मार्चचा गुरुवारी सातवा दिवस आहे.

### चर्चेतली बातमी

## एलॉन मस्क ट्विटरच्या ५० टक्के कर्मचाऱ्यांना काढणार?

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** ट्विटरचे मालक एलॉन मस्क यांनी या कंपनीमधून तीन हजार ७०० नोकऱ्यांची कपात करण्याची योजना आखली आहे. ही संख्या या सोशल मीडिया कंपनीच्या एकूण मनुष्यबळापेक्षा जवळपास अर्धी आहे. 'ब्लुमबर्ग'ने याबाबतचे वृत्त दिले आहे. कंपनीच्या खर्चात कपात करण्यासाठी मस्क यांच्याकडून हा निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, कुठूनही काम करण्याची कंपनीची योजनाही बंद करण्याच्या तयारीत मस्क असल्याचे बोलले जात आहे. या कर्मचाऱ्यांना कार्यालयातून काम करण्यास सांगितलं जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सॅन फ्रान्सिको स्थित या कंपनीतील नोकरकपातीच्या संख्येसह इतर धोरणांमध्ये बदल केले जाण्याची शक्यता आहे. या कंपनीतून काढल्या जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना दोन महिन्यांच्या पगाराएवढा 'सेवरन्स पे' दिला जाऊ शकतो, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. या वृत्तावर ट्विटरच्या प्रवक्त्याकडून अद्याप भूमिका स्पष्ट करण्यात आली नाही. ट्विटरचे मालकी हक्क मिळताच कंपनीच्या धोरणांमध्ये मस्क यांच्याकडून बदल केले जात आहेत. ट्विटरच्या वापरकर्त्यांना अकाऊंट वेरिफाईड करुन 'ब्लू टिक' मिळवण्यासाठी आठ डॉलर म्हणजेच अंदाजे ६६१ रुपये प्रती महिना मोजावे लागणार आहेत. ट्विटरसोबत काम करण्यास उत्सुक असलेल्या प्रकाशकांना 'पेवॉल बायपास' ची सुविधाही उपलब्ध केली जाणार आहे.


# पत्रकारांवर भाजपाकडून दबाव टाकण्याचा अश्लाघ्य प्रकार

## पत्रकारांना HMV व चाय-बिस्कुटवाले म्हणणाऱ्यांनी माफी मागावी : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : प्रसारमाध्यमे ही लोकशाहीचा चौथा स्तंभ आहेत. सरकारला जाब विचारणे, त्यांच्या धोरणांवर टीका करणे हे त्यांचे कामच आहे परंतु लोकशाही व संविधानाला न मानणाऱ्या भारतीय जनता पक्षाने पत्रकारांना HMV (HIS MASTERS VOICE) असे संबोधित करून गुलामाची उपमा देणे हा दबाव टाकण्याचा अश्लाघ्य प्रकार आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांकडूनच असा प्रकार होत असेल तर हे महाराष्ट्राचे दुर्दैव असून भाजपा व देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकाराबद्दल माफी मागितली पाहिजे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे. यासंदर्भात बोलताना नाना पटोले म्हणाले की, २०१४ साली केंद्रात भारतीय जनता पक्षाचे सरकार आल्यापासून सर्वच यंत्रणांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले आहे. सरकारच्या इशाऱ्यावर त्यांना नाचवण्याचा प्रयत्न सुरु आहे. प्रसारमाध्यमे ही लोकशाही शासन प्रणालीत जागल्याचे काम करत असतात. समाजाच्या हितासाठी ते काम करत असतात, सरकारवर टीका केली, सरकारला जाब विचारला तर माध्यमांचे काय चुकले? पण सत्तेचा कैफ चढला की टीकाही सहन होत नाही म्हणून त्यांच्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला जातो. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांचा HMV असा उल्लेख करणे व त्याच पक्षाचा आमदार पराग शहा पत्रकारांना चाय- बिस्कुटवाले म्हणत अपमान करतो ही सत्तेची मस्ती चढल्याचा प्रकार आहे. सरकारकडून पत्रकार व प्रसार माध्यमांवर दबाव टाकण्याच्या या प्रकाराचा काँग्रेस पक्ष निषेध करत असून प्रसार माध्यमांचे स्वातंत्र्य व त्यांच्या हक्कासाठी काँग्रेस सदैव त्यांच्या पाठीशी राहील.

शिवप्रतिष्ठाचे संस्थापक संभाजी भिडे यांनीही एका महिला पत्रकाराला 'आधी कुंकू लाव मग तुझाशी बोलतो', असे म्हणत जाहीर अपमान केला. महिलेचे कर्तृत्व कुंकू लावण्याने सिद्ध होते का? तिचे काम व कुंकू याचा काय संबंध आहे? संभाजी भिडे यांनी महिला पत्रकाराचा केलेला अपमान हा समस्त महिला वर्गाचा अपमान आहे. महिलेला तुच्छ लेखणाऱ्या अहंकारी पुरुषी मानसिकतेतून आलेला हा प्रकार असून भिडे ही समाजातली विकृत्ती आहे. अशा विकृत्तीला आळा घातला पाहिजे परंतु पुरोगामी महाराष्ट्राच्या मंत्रालयात अशा विकृत्तींना मानाचे स्थान दिले जाते हे त्याहून दुर्दैवी आहे. महाराष्ट्राला आचार्य बाळशास्त्री जांभेकर, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आचार्य अत्रे यांच्यासारख्या थोर व महान पत्रकारांचा वारसा लाभलेला आहे. याच महाराष्ट्रात पत्रकारांचा अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन सत्ताधा-यांकडून अपमान केला जात आहे हे योग्य नाही, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# गाथा एका शूरवीराची

आधुनिक केसरी

देशभक्तीने भारलेल्या हेमंतला 'बेस्ट' मधील निर्जीव आकडेमोड करण्यापेक्षा काहीतरी वेगळे करण्याची उर्मी मनात दाटून आली होती. भारताला स्वातंत्र्य मिळूनही माझ्या देशाचा एक भाग असलेला गोवा अजून पारतंत्र्यात का याचा सल त्याचा मनात होता. आता मनात निश्चय झाला होता. ' बेस्ट इज नो लॉंगर बेस्ट. चलो गोवा. ' एका सहल कंपनीच्या जाहिरातीप्रमाणे ' चलो बॅग भरो और निकल पडो ' अशी हेमंतने बॅग भरली आणि तो तडक पणजीला आला. अर्थात तो गोव्याला काही सहलीला आला नव्हता. त्याचे ध्येय वेगळेच होते. त्याला ते सगळ्यांसमोर उघडही करायचे नव्हते. इथे त्याने आपले नाव बदलून ओळख लपवली. त्याचे गणित उत्तम असल्याने एका शाळेत शिक्षक म्हणून सहज नोकरी मिळाली. मग माणसे जोडायला सुरुवात झाली. परिसराची हिंडून फिरून उत्तम माहिती त्याने करून घेतली. पणजी येथील आग्वाद फोर्टचे ऐतिहासिक आणि भौगोलिक महत्व त्याच्या लक्षात आले. याच किल्ल्यावर पोर्तुगीजांची मदार होती. या ठिकाणी त्यांचे महत्वाचे कार्यालय होते. त्यांचे निशाण याच किल्ल्यावर फडकत होते. या निशाणाच्या जागी माझ्या भारताचा तिरंगा कधी डौलाने फडकेल हाच विचार सारखा त्याच्या मनात होता. आता योजना त्याच्या डोक्यात आकार घेत होती. १५ ऑगस्टचा दिवस हेमंतने निवडला. १५ ऑगस्ट १९५४. आपली योजना कार्यान्वित करण्याआधी हेमंतने गोव्याच्या गव्हर्नरला तसे पत्र पाठवून सूचितही केले होते. ती १५ ऑगस्टची स्वातंत्र्याची पहाट उजाडली. हेमंत ठरल्याप्रमाणे आपल्या काही साथीदारांसह आग्वाद फोर्टमध्ये पोहोचला. पहारेकऱ्यांना बोलण्यात गुंतवून त्यांची नजर चुकवून हेमंत सरसर झेंड्यापर्यंत पोहोचला. पोर्तुगीज निशाण खाली खेचून त्याने तिरंगा त्या ठिकाणी प्रस्थापित केला. **(क्रमशः)**



क्रांतिसूर्य हेमंत लक्ष्मण सोमण



## आनंदी पहाट

# सुंदर असणे आणि दिसणे दोन्हीही महत्वाचे

आधुनिक केसरी

दैनंदिन आयुष्यांत स्वतःच्या अशा कितीतरी प्रकारच्या, आपले जीवन जगण्याच्या, नवनवीन कल्पना आपल्या मनांत येतात. प्रत्येकालाच असे वाटत असते कि, आपले आयुष्य इतरांपेक्षा निराळे असावे. जगाने कौतुक करावे असे आपले जीवन असावे. आपल्या प्रत्येक बाबतीत काही-ना-काही वेगळेपण असावे, असे अनेकदा आपल्याला वाटत असते. इतरांपेक्षा मी आणि माझी प्रत्येक गोष्ट भिन्न असण्यासाठी प्रत्येकाची धडपड सुरु असते. त्यासाठी बदलत चाललेल्या जीवनमूल्यांचा स्विकार करावा लागतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

सद्यःस्थितीत अनेकदा साधेपणा म्हणजे भोळेपणा अथवा गबाळेपणा समजला जातो. अत्याधुनिक विचारसरणी आणि काही प्रमाणात अंधानुकरण ह्यामुळे एकूणच आपल्या राहणीमानात बरेच बदल होत असल्याचे आपण सर्वच जण अनुभवत आहोत. एका अर्थी हे होणारे बदल आपला विकासच घडवत असतात. आपले केवळ नीटनेटके राहणे हे पुरेसे नसून आपण चारचौघांमध्ये वेगळे आणि आकर्षक दिसणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे आहे त्यांत समाधान मिळत आहे का? आपण प्राप्त परिस्थितीत सुखसमाधान मिळवू शकत आहोत का? अशा स्वरूपांच्या मनांत येणाऱ्या प्रश्नांमुळेच आपण दुःखी होत राहतो, कशातच समाधान मिळत नाही, असे म्हणत आपले दुःख मिरवत राहतो. मुळातच सुंदर असणे आणि आकर्षक दिसणे ह्या दोन्ही गोष्टी जरी सौंदर्याची अनुभूती देणाऱ्या असल्या, तरीही केवळ सुंदर असणे सुद्धा पुरेसे नसून आकर्षक दिसणे आणि त्यासाठी नीटनेटके राहणे आवश्यक झाले आहे. त्यामुळेच सुंदर असण्यापेक्षाही सुंदर दिसण्याकडे अनेकजणांचा कल असल्याचे दिसून येत आहे.

सुंदर दिसण्यासाठी केवळ स्वप्नावस्थाच कारणीभूत ठरत असते. आपण सुंदर दिसायला लागलो तर काय काय घडेल? ह्याचा विचार करत आपण स्वप्न रंगवायला लागतो. ही स्वप्नावस्था आपल्याला जे हवे आहे ते मिळवून देण्याचे काम करत असते.



आधुनिक केसरी

## करतो सांभाळ | पांडुरंग ||

कुणाच्या कारणे | वेदना कुणाला ||
उगाच जीवाला | तळमळ ||१||

असे सदाचार | ज्याचा नित्य नेम ||
यातनाच ठाम | त्याचे भाळी ||२||

सात्विकाचे जिने | बोचते का जना? ||
दांभिक सज्जना | छळतसे ||३||

ज्याच्या मना नाही | विकारांचा दंश ||
जाण तोचि वंश | ज्ञाना-तुका ||४||

रामकृष्ण हरि | भजे सर्वकाळ ||
करतो सांभाळ | पांडुरंग ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी


### श्रद्धा

भक्ती देण्या माझ्या समोरी अंबामाय आली हो।
रूप निर्गुणाचे त्यागोनी माय सगुण झाली हो।।
जन्मांतरीचे भाग्य माझे ऐसे फळा आले हो।
आज माझ्या स्वप्नी आराध्य प्रकटले हो।।
रूप तिचे पाहता संदेह काही नुरले हो।
प्रेमे तिने पाहता नयनी पाणी आले हो।।
चरण घट्ट धरण्याचे हट्ट माझे पुरले हो।
बिकट संकटाचे घाट सारे सरले हो।।
तिजसी सर्व अर्पूनी मन शांत झाले हो।
गुरुकृपे चंद्रहास भक्तीवाट चाले हो।।
परतीचे मार्ग सारे आता बंद केले हो।
आत म्या येवोनी कडीकोंडे लावले हो।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



### चतुर्दश ब्रम्हाचा

आधुनिक केसरी

**श्लोक।।**
भाषाभेदाश्च वर्तन्ते अर्थ एको न संशयः
पात्रद्वये यथा खाद्यं
स्वादभेदो न विद्यते।।

भाषां भाषांचा भेद असतो पण त्या भेदामध्ये अर्थ एक असतो. समजा लाडू केले आहेत दोन वेगवेगळ्या डब्यात ते भरले आहेत. लाडू ते च आहेत त्यामुळे दोन डब्यात जरी भरले तरीही त्याची रूची बदलत नाही. तसेच भाषा भिन्नभिन्न असली तरी त्याचा गर्भितार्थ एकच असतो.ऊत्तम फळे खावीत बीया टरफले टाकून द्यावीत. त्याप्रमाणे चांगलं ते घ्यावं वाईट ते टाकून द्यावे. हा समर्थाचा मोलाचा सल्ला आमलात आणावा व आयुष्य आनंदाने जगावे. अध्यात्म हा अनुभवण्याचा विषय आहे.




सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

ज्याला त्याची तळमळ आहे त्यालाच तो अर्थ समजेल. परमार्थ यथार्थ पणे समजण्यासाठी आधी तुमची बुध्दी शुद्ध असली पाहिजे. आतबाहेर सर्वत्र माया प्रेम हे वागण्यातुन बोलण्यातुन असले पाहिजे. प्रपंच करत असताना वाटेल ते उलटसुलट धंदे करून फावल्या वेळात अध्यात्माची चव घेणाऱ्यांना परमार्थ धड कळत नाही अनुभवायला येत नाही. अर्थ हा सार असुन भाषा ही असार आहे. केवळ अहंकारी स्वभावाचे लोक खोटा अभिमान बाळगतात आणि वितंडवाद घालत बसतात. त्यामुळे मित्रांनो होतं काय की हाती काही लागत नाही फक्त मन दुभंगल्याने एकमेकां विषयी प्रेम रहात नाही म्हणून खरं तर सामंजस्याने रहावं एखादा चुकल तर प्रेमाने त्याला त्याची चुक दाखवून द्यावी पून्हा असं वागू नकोस हे समजावून सांगावे. थोडक्यात भांडकुदळ असु नये व अहंकारी स्वभाव तर बिलकुल असु नये. कठोरभाषा कठोर शब्द आयुष्य संपवून टाकतात. म्हणून संतांचे पण हेच सांगणे आहे की दुर्लभ असलेला हा नरदेह मिळाला आहे तर त्याचे सोने करा. भांडत बसुन वेळ पैसा प्रतिष्ठा वाया घालवू नका. समर्थ पुढे म्हणतात की रत्न पारख्या समोर आपले रत्न ठेवून पारखून घेतले म्हणजे मनाला समाधान मिळते. त्याच प्रमाणे आत्मज्ञानी पुरूषापुढे अध्यात्मज्ञान बोलावेसे वाटते. मायेच्या जाळ्यात अडकलेल्यांना व ज्याचे मन अस्थिर असते त्याला अध्यात्मिक ज्ञान समजणार नाही. म्हणून सतत सत्संगात रहावे.

# अनन्यतेतच भक्ती जन्म पावते

आधुनिक केसरी

भगवंतावाचून भक्ति होत नाही. ज्याप्रमाणे सौभाग्यवती म्हटली की तिला नवरा असायचाच, त्याप्रमाणे भक्ति म्हटली की तिथे भगवंत असलाच पाहिजे. भगवंत हा भक्तीचा प्राण आहे. भक्ति आणि माया दोघी भगवंताच्याच स्त्रिया आहेत. पण, म्हणून त्या सवती आहेत. दोन सवती एके ठिकाणी सुखाने नांदत नाहीत हा जगाचा अनुभव आहे. मायेला बाजूला करायची झाल्यास आपण भक्तीची कास धरावी. म्हणजे ती मायेस आपोआप हुसकावून लावते. मायेने वर्चस्व नाहीसे झाले की आपले काम होऊन जाते. तालमीत जाणारा आणि तालमीत न जाणारा यांच्यामध्ये थोडातरी फरक दिसायला पाहिजे; तालमीत जाणाऱ्याच्या शरीरावर थोडातरी पीळ दिसायला हवा ना! तसेच, जो भक्ति करतो त्याच्या वृत्तीमध्ये थोडा तरी फरक पडला पाहिजे. आपल्याला जर विद्या पाहिजे असेल तर आपण विद्वानांची संगत धरली पाहिजे, त्याचप्रमाणे आपल्याला भक्ति आणि आनंद पाहिजे असेल तर भगवंताची संगत धरली पाहिजे, सर्व सृष्टी रामरूप दिसणे हेच भक्तीचे फळ आहे. याकरिता अनन्यतेची अत्यंत जरूरी आहे. अनन्यतेतच भक्ति जन्म पावते. द्रौपदीची अनन्यता खरी. भगवंताशिवाय मला दुसरा कोणताच आधार नाही याची



खात्री पटणे, हेच अनन्यतेचे स्वरूप. माझी प्राप्ती करून घ्यायची असेल तर भक्ति हेच साधन आहे असे स्वतः परमात्म्यानेच सांगितले आहे. जसे नामस्मरण विस्मरणाने करता येत नाही, त्याचप्रमाणे भक्ति अभिमानाने करता येत नाही.

समजा, एखाद्या माणसाचे लग्न झाले. तो काल ब्रह्मचारी होता आणि आज गृहस्थाश्रमी झाला; तरी त्याच्या जीवनांतले इतर व्यवसाय चालूच राहतात. त्याचप्रमाणे, आपण भगवंताचे झालो तरी आपले प्रपंचाचे सर्व व्यवहार पूर्ववत् सुरळीत चालतात. जी जी गोष्ट घडेल ती ती आपण भगवंताला सांगावी. भगवंताच्या अस्तित्वाची जाणीव ठेवण्यासाठी, भगवंताला सांगून प्रत्येक काम करावे. भक्तीने भगवंत साधतो आणि फलाशा आपोआप कमी होतात. म्हणून आपण उपासना किंवा भक्ति वाढवावी. 'मी देही आहे,' असे म्हणता म्हणता आपण या देहाचे झालो; तसेच मी देवाचा आहे असे म्हणत गेल्याने आपण देवरूप होऊन जाऊ. पण हे होण्यासाठी सगुणोपासनेची जरूरी आहे. रस्ता चालून गेल्याशिवाय जसे आपले घर गाठता येत नाही, त्याप्रमाणे सगुणोपासनेशिवाय आपल्याला उपाधिरहित होता येत नाही. राम कर्ता आहे ही भावना म्हणजेच सगुणोपासना, आणि हेच खऱ्या भक्तीचे स्वरूप आहे. 'तू जे देशील ते मला आवडेल' असे आपण भगवंताला सांगावे, आणि 'माझ्या देवाला हे आवडेल का ?' अशा भावनेने जगात वागावे.

**बोधवचन :** घडणारी प्रत्येक गोष्ट भगवंताच्या इच्छेने घडते अशी भावना कायम ठेवणे म्हणजेच भक्ति करणे होय.

**-श्री सद्गुरू ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# जि. प. बांधकाम विभागाचा कारभार जीर्ण इमारतीत

## भोकर येथील प्रकार; अधिकाऱ्यांची गैरसोय

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरातील महत्त्वाच्या शासकीय कार्यालयाला सूसज्ज इमारती उभारून वैभवात भर टाकली आहे.एक उणीव मात्र राहून गेली ती म्हणजे इथे नव्याने खेचून आणलेल्या जिल्हा परिषद बांधकाम कार्यकारी अभियंता विभागाला इमारत नसल्याने जीर्ण झालेल्या इमारतीत कारभार थाटला आहे.आयत्या बिळात नागोबा अशी अवस्था झाल्याने अधिका-यांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागतो आहे.संबधीतानी होणारी गैरसोय दूर करून दिलासा द्यावा अशी अपेक्षा आहे.

तालुक्यातील विधायक विकासात्मक कामांना प्राधान्य देऊन तालुक्याचा चेहरा मोहरा बदलून टाकण्यासाठी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी राजकीय वजन वापरून कोट्यावधी रुपयांचा निधी पदरात पाडून घेतला.याच अथक परिश्रमातून तालुक्यातील सूपीक जमीनीवर अक्षरशा विकासाचे नंदनवन फूलून आले आहे हि बाब तालुक्यासाठी भूषणावह आहे हे कुणीच नाकारू शकत नाही.काम करीत असताना थोड्याफार प्रमाणात त्रूट्या असु शकतात हे तितकच सत्य आहे.एकंदरीत विकासाच्या बाबतीत तालूका "नंबर वन " आहे आणि भविष्यात हि उरल्यासुरल्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत त्यामुळे तालुकाला नकाशावर वेगळस्थान मीळेल अशी अपेक्षा आहे.

**बांधकाम कार्यालयास इमारत नाही**

माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी शहरातील महत्त्वाच्या शासकीय कार्यालयास सूसज्ज ईमारती उभारून वैभवात भर टाकली आहे. शहरात नव्याने खेचून आणलेल्या जिल्हा परिषद बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता विभागाला मात्र स्वतंत्र ईमारत नसल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निवासस्थान असलेल्या जीर्ण इमारतीत कारभार सुरू केला आहे.पावसाळ्यात इमारतीला गळती झाल्याने कामात अडचणी येत आहेत.छत आणि भिंतीचा गीलावा खीळखीळ झाला आहे. धोकादायक इमारतीत अधिकारी व कर्मचाऱ्यांना जीव मुठीत धरून काम करावे लागत आहे.वरिष्ठानी याकडे लक्ष देऊन होणारी गैरसोय दूर करावी अशी अपेक्षा आहे.




# अंधेरी पूर्व मतदार संघात सायंकाळी 5 वाजेपर्यंत 28.77 टक्के मतदान



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभेच्या '१६६ - अंधेरी पूर्व' या मुंबई उपनगर जिल्ह्याच्या विधानसभा मतदारसंघातील सर्व २५६ मतदान केंद्रांवर मतदानाला सकाळी ७ वाजतापासून प्रत्यक्ष मतदानास सुरुवात झाली आहे. यात सायंकाळी ५ वाजेपर्यंत २८.७७ टक्के मतदान झाले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी प्रशांत पाटील यांनी दिली आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या '१६६ - अंधेरी पूर्व' या मुंबई उपनगर जिल्ह्याच्या विधानसभा मतदारसंघातील सर्व २५६ मतदान केंद्रांवर मतदानाला सकाळी ७ वाजतापासून प्रत्यक्ष मतदानास सुरुवात झाली आहे. यात दुपारी ३ वाजेपर्यंत २२.८५ टक्के मतदान झाले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी प्रशांत पाटील यांनी दिली आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या '१६६ - अंधेरी पूर्व' या मुंबई उपनगर जिल्ह्याच्या विधानसभा मतदारसंघातील सर्व २५६ मतदान केंद्रांवर मतदानाला सकाळी ७ वाजतापासून प्रत्यक्ष मतदानास सुरुवात झाली आहे. यात दुपारी ३ वाजेपर्यंत २२.८५ टक्के मतदान झाले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी प्रशांत पाटील यांनी दिली आहे. मुंबईतील अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघातील सर्व 256 मतदान केंद्रांवर सकाळी सात वाजेपासून मतदानाला सुरुवात झाली आहे. यात दुपारी एक वाजेपर्यंत 16.89 टक्के मतदान झाले आहे.

# शिकलेली माणसंच गावाकडच्या माणसांना विसरत आहेत : मुंडे

आधुनिक केसरी न्यूज



**बीड :** शिक्षणाचा प्रसार झाल्याने मुले शिकून मोठी झाली, वेगवेगळ्या पदावर गेल्याने श्रीमंतीही आली. तरी दुसऱ्या बाजुला मात्र ऊसतोडणीसाठी जाणाऱ्या मजुरांमध्येही वंजारी समाजाची संख्या अधिकच राहिली. कारण शिकलेली माणसं गावाकडच्या माणसाला विसरत चालली आहेत अशी खंत व्यक्त करुन आगामी काळात जातीपेक्षा समुहाचा विचार करुन महाराष्ट्रात ओबीसी समाजाची एकजुट करुन नेतृत्व करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे असे मत माजी आमदार नारायण मुंडे यांनी व्यक्त केले. तर केवळ शिकलेली माणसे समाज बदलू शकणार नाहीत. त्यासाठी राजकीय शक्ती आणि सत्तेतील पदे मिळाली तरच समाज अधिक मजबूत बनेल असा विश्वास प्रा.सुशिला मोराळे यांनी व्यक्त केला. बीड येथे संत भगवानबाबा प्रबोधनीच्या वतीने नाते समाजाशी कृतज्ञता अमुल्य योगदानाची अंतर्गत रविवार दि. 30 ऑक्टोंबर रोजी माजी आमदार नारायण मुंडे आणि समाजसेवीका प्रा. सुशिला मोराळे यांच्या हस्ते वंजारी समाजात तीस वर्षाहून अधिक काळ विविध क्षेत्रात सामाजिक योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला. यावेळी ॲड. बाळासाहेब राख, सरपंच वैजीनाथ तांदळे, मधुकर ढाकणे, दादासाहेब मुंडे, राजेश बांगर, प्रविण राख, अभिजीत तांदळे, किरण बांगर, शिवराज बांगर, परमेश्वर राख यांचा सामाजिक योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना नारायण मुंडे म्हणाले, समाजातील पहिली पिढी कर्तृत्वाने मोठी झाली, शिकून विविध पदावर गेली, श्रीमंतीही आली असे असले तरी दुसऱ्या बाजुला चित्र विदारक असुन ऊसतोडणीसाठी जाणाऱ्या मजुरांमध्ये समाजाची संख्या मोठी असुन याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. शिकलेली माणसं आपल्या गावाकडच्या माणसांना विसरत चालली आहे. तर प्रा.सुशिला मोराळे यांनी केवळ शिकलेली माणसे समाज बदलू शकत नाहीत. त्यासाठी राजकीय शक्ती व सत्तेची पदे मिळाली तरच उपेक्षित समाज अधिक मजबूत होऊ शकतो. आम्ही निवृत्तीनंतरही सामाजिक कार्यात सक्रीय आहोत. तरुणांनी पुढे येऊन समाजाच्या प्रश्नांसाठी लढले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी दत्तप्रसाद सानप, समर्थ तांदळे, आदित्य दोडके यांनी प्रयत्न केले.

# युवतींच्या स्वसंरक्षण प्रशिक्षणाचा उपक्रम गावोगाव पोहोचवावा : बावनकुळे




आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी काम सुरू केले आहे. सरकारला साथ देण्याच्या हेतूने भारतीय जनता पार्टीतर्फे युवतींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्यासाठी सुरू केलेला उपक्रम स्वागतार्ह असून तो गावोगाव पोहोचवावा, असे आवाहन भाजपा प्रदेशाध्यक्ष मा. चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी केले.

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्रच्या ‘बेटी बचाओ बेटी पढाओ’ प्रकोष्ठतर्फे आयोजित स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबीराच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्रदेश सरचिटणीस ॲड. माधवी नाईक, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, प्रकोष्ठ संयोजक डॉ. शुभा पाध्ये व सहसंयोजक विनय त्रिपाठी उपस्थित होते.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, युवती प्रशिक्षण घेऊन स्वतःचे स्वतः संरक्षण करू शकतात. त्यासाठी भाजपाच्या ‘बेटी बचाओ बेटी पढाओ’ प्रकोष्ठने स्वागतार्ह उपक्रम सुरू केला आहे. महिलांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण मिळण्यासोबतच त्यांचा आत्मविश्वास वाढणे आवश्यक आहे. प्रकोष्ठने हा उपक्रम राज्याच्या सर्व भागात प्रत्येक बूथपर्यंत पोहोचवावा. पक्ष संघटना त्यासाठी पाठबळ देईल.

त्यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला जगभर मान्यता मिळाली आहे. त्यांच्यामुळे सर्व देशात भारतीय पासपोर्टला महत्त्व आले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची आपल्याला संधी मिळाली आहे. त्यांना पाठिंबा देण्यासाठी निवडणुकीत मतदान करण्याची गरज आहे. त्यासाठी १८ वर्षे पूर्ण झालेल्या युवतींनी मतदार नोंदणी अवश्य करावी. स्वसंरक्षणाच्या प्रशिक्षणाच्या मोहिमेसोबत नवमतदारांच्या नोंदणीची मोहीमसुद्धा सुरू केली पाहिजे.



# गुजरात निवडणुकीचे बिगुल

आधुनिक केसरी

गेल्या २५ वर्षांपासून भाजपाची सत्ता असलेल्या गुजरातच्या यंदाच्या विधानसभा निवडणुकीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. यावेळची लढत केवळ भाजपा आणि काँग्रेसमध्ये होणार नाही तर दिल्ली आणि पंजाबमध्ये दणदणीत विजय मिळवणाऱ्या आपनेही गुजरातच्या आखाड्यात उडी घेतली आहे. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'होम ग्राऊंड'वर यावेळी कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अशातच केंद्रीय निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत गुजरात विधानसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. यानुसार गुजरात विधानसभा निवडणूक दोन टप्प्यात होणार आहे. पहिल्या टप्प्यातील मतदान १ डिसेंबरला, तर दुसऱ्या टप्प्यातील मतदान ५ डिसेंबरला होणार आहे. अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखाली आप गुजरातच निवडणुकीत मेक या ब्रेकच्या धरतीवर मैदानात उतरली आहे. दोन वेळा दिल्लीची सत्ता आणि या वर्षी पंजाबमध्ये मिळालेला मोठा विजय या पार्श्वभूमीवर आपचा आत्मविश्वास वाढलेला आहे. राज्यात आपला चांगला प्रतिसाद मिळाल्याची चर्चा आहे. गेल्या काही वर्षापासून राज्यात काँग्रेसच विरोधी पक्ष आहे. अशाच आपने हा जागेवर दावा केला आहे. आपने जर काँग्रेसच्या बरोबरीची कामगिरी केली तर त्याचा पक्षावर गंभीर परिणाम होऊ शकतो. गुजरात निवडणुकीचे परिणाम विरोधी पक्षांवर देखील होणार आहे. या निवडणुकीच्या निकालाचा परिणाम २०२४च्या लोकसभा निवडणुकीवर होऊ शकतो. विधानसभा निवडणुकीआधी ओपिनियन पोलनुसार सध्या तरी राज्यात भाजपला बहुमत मिळेल असे म्हटले आहे. तर काँग्रेसला मागे टाकत आप राज्यात मुख्य विरोधी पक्ष होऊ शकतो. टाइम्स नाउ नवभारताच ओपिनियन पोलनुसार भाजपला १२५ ते १३१ जागा मिळतील. त्यानंतर काँग्रेसला २९ ते ३३ तर आपला १८ ते २२ जागा मिळण्याची शक्यता आहे. अन्यला २ ते ४ जागा मिळतील. या ओपिनियन पोलनुसार मतांच्या टक्केवारीत काँग्रेस आपच्या तुलनेत मागे पडू शकते. काँग्रेसला २१ टक्के तर आपला २४ टक्के मते मिळतील. भाजपला ४८ टक्के इतकी मते मिळण्याचा अंदाज आहे. गेल्या दोन दशकापासून राज्यात भाजपचे सरकार आहे. हिंदुत्वाची प्रयोगशाळा असे मानले जात असताना आपने प्रवेश केला आहे. ABP-CVoterने ऑक्टोबर महिन्यात केलेल्या सर्व्हेमध्ये भाजपला १३५ ते १४३ जागा मिळतील असा अंदाज वर्तवला होता. पण त्यांच्या मतांची टक्केवारी कमी होईल असे देखील म्हटले आहे. काँग्रेसला झटका देत आप अनेक मते स्वत:कडे खेचू शकते. पण त्यांना २ पेक्षा जास्त जागा मिळणार नाही. लोकनिती-सेंटर फॉर द स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीजने गेल्या वर्षी केलेल्या सर्व्हेमध्ये गेल्या पाच वर्षात राज्य सरकारच्या कामगिरीवर जनतेला विचारणा केली होती. तेव्हा दोन तृतियांश जनतेने सरकारच्या कामावर समाधान व्यक्त केले होते. २०१७च्या तुलनेत ११ टक्के अधिक लोकांनी सरकारच्या कामगिरीवर समाधान व्यक्त केले होते.

# समान नागरी संहिता लागू करणे आवश्यक



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**समान नागरी संहिता म्हणजे देशाच्या प्रत्येक नागरिकाला लागू होणारा समान कायदा, मग तो धर्म किंवा जात काहीही असो. सध्या देशात विविध धर्मांसाठी वेगवेगळे वैयक्तिक कायदे आहेत, मात्र समान नागरी कायदा लागू झाल्यानंतर सर्व धर्माच्या लोकांना समान कायद्याचे पालन करावे लागणार आहे. आपल्या देशात धर्माच्या आणि परंपरेच्या नावाखाली वेगवेगळे नियम पाळण्याचे स्वातंत्र्य आहे, पण समान नागरी संहिता लागू झाल्यानंतर विवाह, घटस्फोट, मूल दत्तक घेणे यासारख्या बाबींमध्ये सर्व नागरिकांसाठी समान नियम आहेत. मालमत्तेचे वितरण होईल तसे, त्याच्या अंमलबजावणीमुळे, नागरिकांच्या धार्मिक परंपरा जसे की भोजन, पूजा, पूजा, पोशाख इत्यादींवर कोणताही फरक पडणार नाही.**

राष्ट्रीय स्तरावर अनेक वेळा समान नागरी कायदा लागू करण्यात येईल यावर नेहमीच चर्चा होत असते. चर्चा झाली, परंतु या दिशेने अद्याप कोणतीही ठोस पावले उचलण्यात आलेली नाहीत. सध्या देशातील फक्त एकाच राज्यामध्ये समान नागरी संहिता गोवा आहे. त्याची अंमलबजावणी पोर्तुगीज राजवटीतच झाली होती. १९६१ साली गोवा सरकारी गणवेश होता. नागरी संहिता तयार केली. उत्तराखंड मध्ये न्या रंजना देसाई यांच्या नेतूवाखाली आयोगाची स्थापना करण्यात आली होती. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी समान नागरी संहितेवर समिती स्थापन करण्याची घोषणा केली होती. तसेच यूपीमध्येही त्याची अंमलबजावणी करण्याची तयारी सुरू आहे.
विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर गुजरात सरकारने समान नागरी कायद्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे. राज्यात कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी समिती स्थापन करण्यास मंत्रिमंडळाने शनिवारी मंजुरी दिली. गुजरातमध्ये कोणत्याही क्षणी निवडणूक जाहीर होण्याची शक्यता असल्याने शनिवारी झालेली मंत्रिमंडळाची बैठक शेवटची ठरण्याची शक्यता आहे.
या बैठकीत राज्यात समान नागरी कायदा लागू करण्यासाठी समिती स्थापन करण्यास हिरवा कंदील दाखवण्यात आला. उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन होईल आणि त्यात तीन ते चार सदस्य असतील, अशी माहिती गुजरातचे गृहराज्यमंत्री हर्ष संघवी यांनी दिली.
वास्तविक समान नागरी संहितेचा मुद्दा आहे. हे प्रमुख आश्वासनांपैकी एक आहे. त्यामुळे आता भाजपशासित राज्यांमध्ये त्याची अंमलबजावणी करण्याची प्रक्रिया सुरू होत आहे.
समान नागरी संहिता म्हणजे देशाच्या प्रत्येक नागरिकाला लागू होणारा समान कायदा, मग तो धर्म किंवा जात काहीही असो. सध्या देशात विविध धर्मांसाठी वेगवेगळे वैयक्तिक कायदे आहेत, मात्र समान नागरी कायदा लागू झाल्यानंतर सर्व धर्माच्या लोकांना समान कायद्याचे पालन करावे लागणार आहे. आपल्या देशात धर्माच्या आणि परंपरेच्या नावाखाली वेगवेगळे नियम पाळण्याचे स्वातंत्र्य आहे, पण समान नागरी संहिता लागू झाल्यानंतर विवाह, घटस्फोट, मूल दत्तक घेणे यासारख्या बाबींमध्ये सर्व नागरिकांसाठी समान नियम आहेत. मालमत्तेचे वितरण होईल तसे, त्याच्या अंमलबजावणीमुळे, नागरिकांच्या धार्मिक परंपरा जसे की भोजन, पूजा, पूजा, पोशाख इत्यादींवर कोणताही फरक पडणार नाही.
समान नागरी संहितेला मुस्लिम समाजाचा तीव्र विरोध आहे. जेव्हा १९५१ मध्ये डॉ.बी. आर. आंबेडकर आणि तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी हिंदू समाजासाठी हिंदू कोड बिल आणण्याचा प्रयत्न केला, तेव्हाही त्याविरोधात आवाज उठवला गेला. यासोबतच असा कायदा विशिष्ट धर्मासाठी आणण्यावरही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. समान नागरी संहितेला विरोध करणारे असा युक्तिवाद करतात की या हिंदू कायद्याद्वारे सर्व धर्मांना लागू होईल.
मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाने यावर तीव्र आक्षेप घेत हे आपल्या हक्कांचे उल्लंघन आणि धार्मिक परंपरांवर हल्ला असल्याचे म्हटले आणि ते स्वीकारण्यास नकार दिला. सर्वांसाठी समान कायदा लागू केल्यास मुस्लिमांना एकापेक्षा जास्त विवाह करता येणार नाहीत, असे त्यांचे मत आहे. पत्नीला घटस्फोटासाठी कायद्याचा सहारा घ्यावा लागेल आणि त्यांना त्यांच्या शरियतनुसार संपत्तीची वाटणी करता येणार नाही.
संविधान बनवताना समान नागरी संहितेवर बरीच चर्चा झाली, पण त्यावेळच्या परिस्थितीत त्याची अंमलबजावणी करणे योग्य मानले गेले नाही. म्हणून, कलम ४४ मधील धोरणाच्या निर्देशात्मक तत्त्वांच्या श्रेणीमध्ये याला स्थान देण्यात आले. धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे हे राज्यघटनेचे ते भाग आहेत ज्यांच्या आधारावर सरकारने कार्य करणे अपेक्षित आहे. १९५४-५५मध्ये तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी प्रचंड विरोध होऊनही हिंदू कोड बिल आणले. त्यावर आधारित हिंदू विवाह कायदा आणि उत्तराधिकार कायदा तयार करण्यात आला. म्हणजेच हिंदू, बौद्ध, जैन आणि शीख समाजासाठी विवाह, घटस्फोट, वारसाहक्क असे नियम संसदेत निश्चित करण्यात आले. परंतु मुस्लिम, ख्रिश्चन आणि पारशी समुदायांना त्यांच्या संबंधित धार्मिक कायद्यांचे म्हणजेच वैयक्तिक कायद्याचे पालन करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. ही सवलत अनेक आदिवासी समुदाय जसे की नाग इत्यादींनाही उपलब्ध होती, जे त्यांच्या परंपरेनुसार कायद्यांचे पालन करतात.
सुप्रीम कोर्टाने देखील अनेक वेळा सांगितले आहे की भारत समान नागरी संहिता लागू करण्यासाठी कोणतेही प्रयत्न करत नाही, त्यानंतर सरकारने गेल्या वर्षी कायदा आयोगाला या प्रकरणाचा अहवाल देण्यास सांगितले. विविध लोकांशी सविस्तर चर्चा आणि कायदेशीर आणि सामाजिक परिस्थितीचा आढावा घेऊन विधी आयोगाने सांगितले की, सध्या समान नागरी संहिता लागू करणे शक्य नाही. त्याऐवजी, विद्यमान वैयक्तिक कायद्यांमध्ये सुधारणा केली पाहिजे आणि मूलभूत हक्क आणि धार्मिक स्वातंत्र्य यांच्यात समतोल साधला गेला पाहिजे. संसदेने कौटुंबिक प्रकरणांशी संबंधित वैयक्तिक कायदा लिहिण्याचा विचार करावा. सर्व समाजात समानता आणण्यापूर्वी समाजातील स्त्री-पुरुषांच्या हक्कांमध्ये समानता आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.



समान नागरी संहितेची मागणी करणाऱ्या अनेक याचिका दिल्ली उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. वेगवेगळ्या धर्मांशी संबंधित प्रकरणांमुळे न्यायालयांवर जास्त भार पडतो आणि खटले निकाली काढण्यासाठीही जास्त वेळ लागतो. मात्र समान नागरी संहिता लागू झाल्यानंतर न्यायालयांमधील प्रलंबित खटल्यांचा निकाल लवकर लागेल आणि त्यामुळे न्यायव्यवस्थेवरील भार कमी होईल. त्याची अंमलबजावणी झाल्यानंतर राष्ट्रीय एकात्मता मजबूत होईल आणि देशाच्या राजकारणातही सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. एकसमान संहितेच्या अंमलबजावणीमुळे विवाह, वारसा, वारसाहक्क यासह विविध समस्यांशी संबंधित गुंतागुंतीचे कायदे सोपे होतील आणि ते सर्व नागरिकांना समान रीतीने लागू होतील.
सध्या अस्तित्वात असलेल्या सर्व वैयक्तिक कायद्यांमध्ये लिंगभेदाची समस्या आहे, ज्यावर समान नागरी संहिता लागू करून त्यावर मात करता येईल. समान नागरी संहिता महिला, धार्मिक अल्पसंख्याक आणि असुरक्षित घटकांना सामाजिक सुरक्षा प्रदान करेल. त्याच वेळी, त्याची एकरूपता देशातील राष्ट्रवादी भावना मजबूत करेल. त्यामुळे देशात समान नागरी संहिता लागू करणे अत्यंत आवश्यक आहे, त्यानंतर अनेक वाद आपोआप संपतील.

# जीवनात रागावर नियंत्रण हवेच!

आधुनिक केसरी

**राग हा माणसाच्या जीवनातील सर्वात मोठा घातक शत्रू आहे. आपल्या आजुबाजुला असे अनेक लोक पहायला मिळतील की छोट्या मोठ्या कारणावरून लगेच रागावतात.स्वता:ला चिडचिड करुन घेतात. रागामुळे माणसाचे स्वतःवर नियंत्रण राहत नाही. रागाचा माणसाच्या जीवनावर सखोल परीणाम होत असतो. प्रत्येक गोष्ट मनासारखी होईल असे नाही. त्यासाठी जीवनात कुठेतरी तडजोड केलीच पाहिजे. मी पणाची भावना मनात धरता कामा नये. कधीतरी आपल्या मनाला प्रश्न विचारा आपले मन प्रसन्न असेल तरच माणूस जीवनात यशस्वी ह्वोतो. समाजात वावरताना आपण नेहमी चांगले वागले पाहिजे चांगले, बोलले पाहीजे कोणाविषयी द्वेष बाळगू नये. उलट रागामुळे माणुस स्वतःचा सर्वनाश ओढुन घेतो. आपल्यामुळे कुणाच्या भावना दुखावल्या जाणार नाही याची काळजी घ्यावी.**

संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. ७७२१०४५८४५

रागावर नियंत्रण असले पाहिजे.कधी कधी शांत राहील्याने अनेक कामे झटक्याने होऊ शकतात. रागामुळे माणसाच्या शरीरातील हार्मोन्स अनियंत्रित होतात.शरीराची लवचिकता कमी हौते.व माणुस विचार शुन्य होतो.यामुळे माणसाचा स्वतः वर ताबा राहत नाही.बहुदा काय करावे काय नाही हे कळतच नाही त्यासाठी माणसाने रागीट स्वभाव बदलण्याची गरज आहे.
रागाचा आपल्या आरोग्यावर परिणाम होतो. कधी कधी माणुस रागाच्या भरात रागाने बोलुन जातो.परंतू त्याला आपल्या गोष्टीचा पश्चाताप होतो.त्यासाठी माणसाने मनात राग धरू नये. त्यासाठी जीवनात सकारात्मक राहीले पाहीजे. सकारात्मकतेमुळे आपण रागावर नियंत्रण आणू शकतो.
प्रत्येक व्यक्तीला समजून घेता आलं पाहिजे. आयुष्यात येणारी प्रत्येक व्यक्ती ही खुप महत्वाची असते .कोण कधी कोणाच्या कधी उपयोगी पडेल हे सांगता येत नाही.त्यासाठी राग बाजूला सारा जीवनाचा आनंद घ्यायला शिका .शांत राहणे हे कधीही चांगलेच आहे.
राग ही प्राकृतिक भावना आहे. राग आल्यावर आपण आत्मपरीक्षण करण्याची नितांत गरज आहे.कधीकधी स्वभाव दोषामुळे राग येऊ शकतो.माणुस जेव्हा संतापतो तेव्हा शरीरातील एडीनलीन नावाची रसायनांची संख्या वाढते असं तज्ञांचे मत आहे.खरोखर राग हा माणसाच्या आयुष्यातील अडथळा आहे.



रागामुळे आपण आपले काम बिघडवत असतो. कधी कधी या रागापाई आपण माणुसकीचे नाते देखील गमावून बसतो.त्यासाठी मनावर ताबा असणे गरजेचे आहे.तन,मन, अबाधित ठेवण्याची आवश्यकता आहे.स्वताःवर विश्वास ठेवा.आज रागीट स्वभावामुळे माणुस अनेक आजारांना आमंत्रण देत आहे.राग आल्यावर माणसाने पाणी पिणे हा सर्वोत्तम उपाय आहे.पाणी प्यायल्याने माणुस शांत होतो.
दिर्घ श्वास घ्यायला हवा.दिर्घश्वासामुळे माणुस शांत होतो.व्यायाम, योगासने करावीत आपले मन देखील तंदुरुस्त राहते व मन शांत राहते.संगित ऐका,आवडते छंद जोपासा , यामुळे आपले मन प्रफुल्लित ठेवण्यास मदत होते.म्हणून माणसाचे जीवनात रागावर नियंत्रण असणे गरजेचे आहे

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# गाडीच्या चाव्या विसरून ऑपरेशन थिएटरमध्ये पळणारा डॉक्टर; होय माणुसकी जिवंत आहे



डॉ. प्रवीण सुरवशे
संपर्क क्र. 7738120060

आधुनिक केसरी

**पुण्याच्या कोलंबिया एशिया हॉस्पटलला न्यूरोसर्जरी कन्सल्टंट म्हणून जॉईन होऊन मला एखादाच महिना झाला असेल. मुंबईच्या जे. जे. हॉस्पटलमधून न्यूरोसर्जरीची पदवी संपादन करुन, तिथे केलेल्या ५००० पेक्षा अधिक शस्त्रक्रियांचा प्रदीर्घ अनुभव घेऊन मी पुण्याला आलो होतो. शनिवारी रात्री पूर्ण परिवारासोबत जेवण चालू होते. तेवढ्यात माझा फोन खणखणला. कोलंबिया एशियाच्या इमर्जन्सी रुममधून फोन होता. डॉक्टर बोलत होते. "सर, एका २० वर्षाच्या तरुणाला त्याचे नातेवाईक घेऊन आलेत. तीन तासापूर्वी त्याची गाडी स्लीप होऊन तो रस्त्यावर पडला होता. डोक्याला मार लागला आहे. सुरूवातीला त्याला जवळच्या हॉस्पटलमध्ये नेले होते. पण त्यांना तिथे कळले की, तो जवळजवळ 'ब्रेन डेड' आहे. पुढे काही करुन फार उपयोग होणार नाही. त्यामुळे ते पेशंटला इकडे घेऊन आलेत." 'ब्रेन डेड' म्हणजे ज्या पेशंटचा श्वासस बंद झाला असून मेंदूचे कार्य थांबलेले आहे व फक्त हृदय चालू आहे असा पेशंट ! मी डॉक्टरना विचारले की, "आता काय स्टेटस आहे ?" त्यांनी सांगितले की, "सर त्याचा श्वास बंद पडलेला होता म्हणून आम्ही कृत्रिम श्वासाची नळी बसवली व व्हेंटिलेटरने श्वास देतोय. त्याचे दोन्ही प्युपिल्स (बुबुळ) डायलेट (पूर्णपणे प्रसरण पावलेले) झालेले आहेत." सहसा नॉर्मल माणसामध्ये डोळ्यांच्या बुबुळावर लाईट पडला की, ती आकुंचन प्रसरण पावतात. (परंतू ब्रेन डेड पेशंटमध्ये ती रिॲक्शन दिसत नाही.) "सर, मी ब्रेन चा सी.टी. स्कॅन करून वॉट्सअॅपवर पाठवला आहे."**

मी स्कॅन उघडून पाहिला तर पेशंटच्या मेंदूमध्ये उजव्या बाजूला मोठा रक्तस्त्राव झालेला होता व पूर्ण मेंदू डाव्या बाजूला सरकला होता. स्कॅन बघितला आणि मी हातातला घास तसाच ताटात ठेऊन ताटावरून उठलो. कपडे बदलत बदलतच मी त्यांना सूचना दिल्या व ताबडतोब पेशंटला ऑपरेशन थिएटरमध्ये घेण्यास सांगितले गाडीची चावी घेऊन पळतच मी घराबाहेर पडलो. तोच पप्पा म्हणाले "मी येतो सोडायला, तुम्ही केसच्या नादात गाडी फास्ट चालवाल!" सगळेचजणं जेवणावरून उठले. पण मी त्यांना सांगितलं, "काळजी करू नका. मी गाडी सावकाश चालवतो." मला १० वाजता फोन आला होता. केवळ ०७ मिनिटातच मी हॉस्पिटलमध्ये पोहोचलो. गाडी मी इमर्जन्सी रूमच्या दारापर्यंत नेवून तशीच सोडून दिली. दार उघडे, चावी गाडीलाच आणि मी पळतच हॉस्पिटलमध्ये घूसलो. सिक्युरिटी गार्डनी सांगितले, "सर पेशंट वरती आय.सी.यू. मध्ये शिफ्ट केलाय." लिफ्टसाठी न थांबताच जीना चढून मी पळतच आय.सी.यू. मध्ये पोहोचलो. पेशंटला बघितलं तर त्याची दोन्ही बुबुळं प्रसरण पावलेल्या अवस्थेत होती. श्वास पूर्णपणे बंद पडलेला होता आणि व्हेंटिलेटर द्वारा श्वास देण्यात येत होता.

नातेवाईकांशी बोलणे गरजेचे होते.मी त्यांना म्हणालो," पेशंट वाचण्याचे चान्सेस ५% पेक्षा कमी आहेत. तरी देखील ऑपरेशन करावं हा माझा निर्णय आहे. कारण पेशंट तरुण आहे व मार लागून फार वेळ झालेला नाही. पेशंटला जगण्याची एक संधी द्यायला हवी. थोडा देखील वेळ वाया घालवला तर पेशंट हाती लागणार नाही.तुम्ही ठरवा ! "

नातेवाईक चांगलेच हडबडले होते.त्यांचा अजूनही विश्वास बसत नव्हता. तीन तासांमध्ये सगळं होत्याचं नव्हतं झालं होतं!ते कोणताही निर्णय घेण्याच्या परिस्थितीत नव्हते पण त्यांची परवानगी येईपर्यंत मला थांबणं शक्य नव्हतं. मी जोरात ओरडलो," पेशंट ताबडतोब ऑपरेशन थिएटरमध्ये घ्या." आजूबाजूला १०-१५ स्टाफ उभे होते. सर्वजण माझं ते रुप पाहून हादरले होते. बेडसकटच पेशंट ऑपरेशन थिएटर मध्ये शिफ्ट केला. १० वा. १० मि. नी पेशंट ऑपरेशन टेबलवर होता.

जनरली ऑपरेशन करण्याआधी इन्फेक्शन कंट्रोल म्हणून पेशंटचं डोकं बिटाडीन आणि सॅव्हलॉन ने १० मिनिटं स्वच्छ धुतलं जातं, तसेच ऑपरेशन करणारे डॉक्टर व नर्स देखील ७ मिनिटे वॉश घेतात आणि मगच सर्जरीला सुरूवात होते पण ती १७ मिनिटे सध्या मी देऊ शकत नव्हतो कारण मेंदूमध्ये प्रेशर खूपच वाढत होते आणि अशा अवस्थेत एका सेकंदाला हजारो न्यरॉन्सची( मेंदूच्या पेशी) डेथ होते( मरण पावतात). मेंदूमधील या मेलेल्या पेशी कधीही रिजनरेट (परत तयार )होत नाहीत. त्यामुळे लवकरात लवकर ऑपरेशन करून झालेला रक्तस्त्राव बाहेर काढणे व मेंदूवरील प्रेशर कमी करणे गरजेचे होते. वॉर्डबॉयनी पटकन पेशंटचे केस कापले आणि तोपर्यंत मी वॉश घेऊन आलो. सिस्टरना सांगितले, "ऑपरेशनच्या साहित्याची ट्रॉली लावत बसू नका. सर्व साहित्य पसरून ठेवा. लागेल तसे साहित्य मी घेतो." ऑपरेशन थिएटर मधील सर्वजण अतिशय वेगाने काम करत होते, जणू काही प्रत्येकाला चार चार हात फुटले होते. आता प्रश्न होता भूलतज्ञांचा. त्यांना यायला ४-५ मिनिटे लागणार होती. आणि ते आल्यावरही पूर्ण भूल देण्यासाठी १०-१५ मिनिटे वेळ गेलाच असता, त्यामुळे मी पूर्ण भूल न देता जागीच भूल देऊन (लोकल अनेस्थेशिया) ऑपरेशन सुरू केले. मी कवटी ड्रील करण्यास सुरूवात केली आणि तोपर्यंत भूलतज्ञ आले. सहसा भूलतज्ञांनी परवानगी दिल्याशिवाय कोणताही पेशंट ऑपरेशन थिएटर मध्ये घेतला जात नाही, परंतु इथे सर्वच नियमांचे उल्लंघन झाले होते. पण त्यांनी प्रसंगाचे गांभीर्य ओळखून मला एक शब्दही न विचारता पेशंटचा ताबा घेतला. मी कवटी उघडून रक्ताच्या गाठीपर्यंत पोहोचलो. साधारणपणे अर्धा लिटर रक्त गोठून रक्ताची गाठ तयार झाली होती व मेंदूवर प्रेशर निर्माण करत होती. मी रक्ताची गाठ काढून टाकली व मेंदूच्या रिस्पॉन्सची वाट बघू लागलो.पुढच्या १-२ मिनिटात दबलेला मेंदू पूर्वस्थितीत आला आणि मेंदूचे पल्सेशन हालचाल) दिसू लागली. आता मी डोके वर काढून घड्याळाकडे पाहिले तर १० वा. २७ मि. झाली होती. म्हणजेच मला फोन आल्या पासून केवळ २७ मिनिटात ऑपरेशन पूर्ण होऊन त्याच्या मेंदूवरील प्रेशर काढून घेतले होते. आता मी पूर्ण टीमला रिलॅक्स होण्यास सांगितले व उर्वरित ऑपरेशन पूर्ण केले.

ऑपरेशन पूर्ण झाले होते. परंतु अजूनही मन बैचेन होते. काहीतरी चुकत असल्याची जाणीव होत होती. आज माझा सिक्स्थ सेन्स मला सांगत होता की काहीतरी अपूर्ण आहे. म्हणून मी लगेचच सीटी स्कॅन करून बघायचे ठरवले. पेशंटला ओ. टी. मधून डायरेक्ट सी.टी. स्कॅन युनिटमध्ये शिफ्ट करण्यात आले. आणि माझा अंदाज खरा ठरला. आता पेशंटच्या मेंदूच्या दुसऱ्या बाजूला (डाव्या बाजूला) रक्ताची तेवढीच मोठी गाठ तयार झाली होती. पहिल्या स्कॅनमध्ये हा रक्तस्त्राव अजिबातच दिसला नव्हता. आता दुसरे ऑपरेशन करून तो रक्तस्त्रावही काढणे गरजेचे होते. मी पेशंटचे बुबुळ परत तपासले, त्यामध्ये कोणतीही रिॲक्शन दिसत नव्हती.आता मला प्रश्न पडला की जवळपास ब्रेन डेड झालेल्या अशा पेशंटवर दुसरी सर्जरी करणे योग्य आहे का? पण मी घेतलेली जबाबदारी पूर्ण करावयाचे ठरवले. नातेवाईकांना सांगितले की, ताबडतोब दुसरे ऑपरेशन करावे लागेल. पेशंटचे नातेवाईक आधीच भेदरलेले होते.

ते म्हणाले, " सर, आम्ही आमचा पेशंट गेलाच आहे असे समजत होतो , परंतू तुमची धडपड पाहून आम्हाला वाटते की आपणास जो योग्य वाटेल तो निर्णय घ्या. त्याला आमची सहमती आहे."

मी लगेचच पेशंटला ऑपरेशन थिएटर मध्ये हालवले व ऑपरेशनला सुरूवात केली. पण यावेळी आणखीनच मोठा प्रॉब्लेम निर्माण झाला होता. एवढ्या सगळ्या रस्क्तस्त्रावानंतर पेशंटची रक्त गोठण्याची प्रक्रियाच बंद झाली होती. रक्त पाण्यासारखे वाहू लागले व काहीच करणे शक्य होईना. भूलतज्ञानी दुसऱ्या बाजूने त्याची लढाई चालू ठेवली. ते पेशंटला रक्त चढवत होते. मी कवटी उघडून शक्य होईल तेवढी रक्ताची गाठ काढली, पण मला माहित होते की, रक्त गोठण्याची प्रक्रिया बंद पडल्याने तेथे रक्तस्त्राव होत राहणार.म्हणून मी एक युक्ती केली.जिथे रक्तस्त्राव होत होता तिथे एक ड्रेन ठेवला. (ड्रेन म्हणजे एक रबरी नळी असून तिचे एक टोक कवटीमध्ये ठेवले जाते व दुसरे टोक बाहेर पिशवीमध्ये सोडले जाते) या ड्रेनचा हेतू हा असतो की, आत होणारा रक्तस्त्राव तिथेच थांबून मेंदूवर प्रेशर निर्माण करण्याऐवजी, रक्त बाहेर पिशवीमध्ये सोडले जावे. ऑपरेशन पूर्ण करून मी पेशंटला आय. सी. यू मध्ये शिफ्ट केले. परंतु पेशंटच्या बुबुळांमध्ये अजूनही कोणतीही रिॲक्शन आली नव्हती.

आता मात्र मन अत्यंत निराश झाले. एवढे करूनही काही फायदा होईल असे वाटेना. मी डॉक्टर रूममध्ये जायला निघालो, तेवढ्यात एक सिक्युरिटी गार्ड पळत आला आणि म्हणाला, " सर, तुम्ही तुमची गाडी कॅज्युअल्टिच्या दारामध्ये तशीच उघडी ठेवली होती, मी ती पाठीमागच्या बाजूस पार्किंगमध्ये पार्क केली आहे. ही चावी घ्या." मी त्याला धन्यवाद दिले व डॉक्टर रुममध्ये जाऊन बसलो.

आता माझे सर्व प्रयत्न करून संपले होते. वेळ होती ती परमेश्वराला शरण जाण्याची! मी परमेश्वराचे नामस्मरण करू लागलो. या सर्व प्रयत्नांना यश येण्यासाठी नम्रपणे निवेदन ठेवले.तोच काय तो आधार होता! साधारण अर्धा तास असाच गेला असेल एवढ्यात इंटेन्सिव्हीस्ट पळत आले आणि म्हणाले," सर, लवकर चला. पेशंटला बघा



चला." मी लगेचच जावून पाहिलं तर काय चमत्कार ! त्याच्या दोन्ही बुबुळांमध्ये आता रिॲक्शन दिसत होती.

माझ्याही जीवात जीव आला. नातेवाईकांनाही तसं समजावलं.

त्यानंतर मी निर्णय घेतला की, पेशंटला पुढचे ४८ तास बेशुद्धच ठेवायचे. कारण मेंदूमधील रक्तस्त्राव पूर्णपणे थांबला नव्हता. त्यानंतर पेशंटला जवळ जवळ १५ बाटल्या रक्त/पांढऱ्या पेशी दिल्या गेल्या. पुढचे ४८ तास माझ्यासाठी खूपच अवघड होते. त्या पेशंटसाठी जवळपास ३०-४० जणांचे फोन आले असतील. सर्वांचीच आशा माझ्यावरती होती. "मी प्रयत्न करतो!" या एका शब्दावर ते सगळे तग धरून होते. ४८ तास त्याचे सर्व नातेवाईक आय. सी. यू. च्या दारात बसूनच होते. मी देखील दिवसातून १०-१५ वेळा पेशंटला बघायचो. जर अचानक त्याची बुबुळे प्रतिसाद देणे बंद झाले तर पेशंटची तिसरी सर्जरी करावी लागण्याची शक्यता होती. नातेवाईकांना खूप शंका असायच्या. ते म्हणायचे डॉक्टर, पहिल्या स्कॅनमध्ये दुसऱ्या बाजूचा रक्तस्त्राव अजिबातच दिसला नाही असे कसे झाले? आणि पहिले ऑपरेशन झाल्यानंतर दुसऱ्या बाजूस एवढी मोठी रक्ताची गाठ कशी काय तयार झाली? मग मी त्यांना सांगितले की, पेशंट ज्या वेळी पडला त्यावेळी त्याला डोक्याच्या दोन्ही बाजूला मार लागला असावा त्यामुळे दोन्ही बाजूला रक्तस्त्राव सुरू झाला पण उजव्या बाजूला मोठी रक्तवाहीनी फुटल्यामुळे थोड्याच वेळात खूप रक्त जमा झाले व त्यामुळे मेंदूवर खूप प्रेशर आले. उजव्या बाजूने प्रेशर आल्याने मेंदू डाव्या बाजूस सरकला गेला आणि डाव्या बाजूचा रक्तस्त्राव तात्पुरता बंद झाला. पण जसे मी उजव्या बाजूची रक्ताची गाठ काढुन घेतली तसे मेंदूवरील प्रेशर कमी होऊन मेंदू पूर्वस्थितीत आला. त्यामुळे डाव्या बाजूने थांबलेला रक्तस्त्राव पुन्हा सुरू झाला. त्यामुळेच दुसरे ऑपरेशन करून तीही रक्ताची गाठ काढणे आवश्यक वाटले. अशा तऱ्हेने त्यांच्या बहुतेक शंकाचे निरसन मी केले होते. पुढचे ४८ तास मी घरीही बैचैन असायचो माझी तगमग बघून माझ्या पप्पांनी व माँसाहेबांनी ही देवाला साकडे घातले. सर्व घरच परमेश्वर चरणी लीन झाले होते. आणि ४८ तासानंतर माझ्या परीक्षेचा दिवस उजाडला पेशंटला स्कॅन करण्यासाठी शिफ्ट केले आणि काय आश्चर्य ! मी केलेली ती ड्रेनची युक्ती उपयोगी पडली होती. पेशंटचा स्कॅन एकदम छान होता. दोन्ही बाजूंचा रक्तस्त्राव पूर्णपणे निघाला होता. पेशंटला आय. सी. यू. मध्ये शिफ्ट केले व त्याला शुद्धीवर आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले. पेशंटची भूल बंद केली आणि तासाभरात पेशंटने हातपाय हालवण्यास व डोळे उघडण्यास सुरूवात केली. आय .सी. यू. च्या पूर्ण टीमने जल्लोष केला. प्रत्येकजण एकमेकांचे अभिनंदन करीत होता. पुढच्या ३/४ तासात त्याचा श्वासही चांगला चालू लागला त्यामुळे मी व्हेंटिलेटरही काढून घेतला. आता त्याच्या आई-वडीलांना आय.सी.यू. मध्ये बोलाऊन घेतले गेले. ते बिचारे घाबरतच आत आले. काय माहित आपल्या मुलाला कुठल्या अवस्थेत बघावे लागेल? त्याची आई तर अजूनही मुलाला बघण्याआधी डोळे घट्ट मिटून देवाचा धावा करीत होती. मी त्यांना त्यांच्या मुलासमोर घेऊन गेलो आणि काय आश्चर्य! तो डोळे उघडून आईवडिलांकडे बघून हसत होता. त्याच्या आई वडिलांना खरच सुखद धक्का बसला. मी त्याला विचारले हे कोण आहेत? तू ओळखतोस का यांना? तर तो म्हणाला, " यस दे आर माय मॉम अँण्ड डॅड." आईवडील तर जणू स्तब्धच झाले होते. दोघांच्याही तोंडातून शब्दच फुटत नव्हते. मनातल्या साऱ्या भावना डोळ्यांतील अश्रूवाटे बाहेर पडत होत्या. वडिलांनी अजूनही माझा हात घट्ट पकडून ठेवला होता. त्यांचा हात माझ्या हातात तसाच ठेऊन मी म्हणालो. "ही इज अ बॉर्न फायटर!

तुमचा मुलगा सुखरूप परत आला!"आणि आम्ही लढाई जिंकली होती! एक जवळजवळ ब्रेन डेड होणारा पेशंट जागा होऊन आमच्याशी बोलत होता. विशेष म्हणजे त्याला कोणतेही व्यंग (न्यूरॉलॉजिकल डेफिसिट) आले नव्हते. त्यांच्या नातेवाईकांच्या आनंदाला पारावार राहिला नव्हता. डोळ्यातून वाहणाऱ्या पाण्याला सीमा राहिली नव्हती

हॉस्पिटलमध्ये आनंदाचे वातावरण होते. पुढच्या ७-८ दिवसांमध्ये तो पूर्णपणे बरा झाला आणि डिश्चार्ज होऊन घरी जाताना त्याने मला आश्वासन दिले की,इथून पुढे मला बोनस म्हणून मिळालेल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण सत्कारणी लावेन.

खरच ! आयुष्यामध्ये असे काही अनुभव येतात की, जे तुम्हाला त्या दैवी शक्तीचे सामर्थ्य आणि अस्तित्व मान्य करण्यासाठी भाग पाडतात!

# आपले मन आवरायला नको का ?

आधुनिक केसरी

**आपण वरचेवर घरात आवराआवर करत असतो. उपयोगी गोष्टी ठेवून देतो. कमी महत्त्वाच्या गोष्टी बाजूला ठेवतो आणि निरुपयोगी वस्तू फेकून देतो. फेकायचा वस्तू, ठेवलेल्या वस्तूच्या एक दशांश असतात. मात्र, काही काळाने कमी महत्त्वाच्या वस्तूदेखील अडगळीत जाऊन त्याचे रुपांतर निरुपयोगी वस्तूंमध्ये होते आणि नव्या वस्तूंसाठी जागा मोकळी होते. त्याचपद्धतीने आपल्याला रोजच्या रोज मनाचा कप्पा आवरायचा आहे. चांगल्या आठवणी, चांगले लोक, चांगले संवाद, चांगले क्षण मनात साठवायचे. अडगळीच्या गोष्टी काढून टाकायच्या आणि कमी महत्त्वाच्या गोष्टी तपासून घेत हळू हळू कमी करायच्या. हे एकाएकी जमणार नाही, परंतु सरावाने निश्चित जमेल.**

आपल्या रोजच्या वस्तू आपण नीटनेटक्या ठेवतो. त्यांची देखभाल करतो, आवराआवर करतो, परंतु सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपले मन, ते आवरायला नको का? ते अनावर मन कसे आवरायचे, तेच आपण पाहूया. आपण रोज जेवतो. कोणी दोनदा, कोणी तीनदा, तर कोणी दिवसभर. परंतु खाल्लेल्या अन्नाचा निचरा झाला नाही, तर काय होईल? आपण रोज पाणी पितो. कोणी एक लीटर, कोणी दोन लीटर, कोणी त्याहून जास्त. परंतु प्यायलेले पाणी शरीरातून बाहेर पडले नाही, तर काय होईल? आपण दर क्षणाला श्वास घेतो. कितीवेळा घेतो, याची मोजदादही ठेवत नाही. योगाभ्यासात श्वास घेण्याचे विशिष्ट तंत्र शिकवले जाते. मात्र घेतलेला श्वास सोडलाच नाही, तर काय होईल? त्याचप्रमाणे कोणतीही गोष्ट घेऊन झाल्यावर ती सोडूनही देता आली पाहिजे. साचून राहिलेल्या गोष्टी खराब होतात. त्यांचा क्षय होतो. त्या निकामी होतात आणि शेवटी नाशवंत होतात.

या भौतिक उदाहरणातून लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे, आपण अनेक गोष्टी मनात साठवून ठेवतो. परंतु त्या गोष्टींचा वेळेत निचरा झाला नाही, तर काय होईल? मनात कितीतरी गोष्टी अकारण साठवलेल्या असतात. मनात असंख्य विषयांची दाटी होते. अस्वस्थता निर्माण होते. मन सतत द्विधा मनस्थितीत अडकून राहते. या सगळ्या गोष्टी तुमच्याही बाबतीत घडत असतील, तर वेळीच मनाचा कप्पा आवरायला घ्या.

आपण वरचेवर घरात आवराआवर करत असतो. उपयोगी गोष्टी ठेवून देतो. कमी महत्त्वाच्या गोष्टी बाजूला ठेवतो आणि निरुपयोगी वस्तू फेकून देतो. फेकायचा वस्तू, ठेवलेल्या वस्तूच्या एक दशांश असतात. मात्र, काही काळाने कमी महत्त्वाच्या वस्तूदेखील अडगळीत जाऊन त्याचे रुपांतर निरुपयोगी वस्तूंमध्ये होते आणि नव्या वस्तूंसाठी जागा मोकळी होते. त्याचपद्धतीने आपल्याला रोजच्या रोज मनाचा कप्पा आवारायचा आहे. चांगल्या आठवणी, चांगले लोक, चांगले संवाद, चांगले क्षण मनात साठवायचे. अडगळीच्या गोष्टी काढून टाकायच्या आणि कमी महत्त्वाच्या गोष्टी तपासून घेत हळू हळू कमी करायच्या. हे एकाएकी जमणार नाही, परंतु सरावाने निश्चित जमेल.

**मनाचा कोपरा आवरण्यासाठी तीन उपाय**

१) वाईट विचार जाळून टाका- विचार जाळायचे कसे, हा प्रश्न पडला असेल, तर एक प्रयोग करा. तुमच्या मनातले वाईटातील वाईट विचार, भीती, द्वेष, मत्सर, राग एका कागदावर लिहून काढा. नीट वाचा. आणखी काही मुद्दे राहिले असतील, तर नोंद करा आणि सगळे काही लिहून झाल्यावर तो कागद शब्दशः जाळून टाका. असे केल्याने खरोखरंच विचार जळतात का? नाही. मात्र, विचार काढून टाकण्याच्या प्रयत्नांना सुरुवात नक्कीच होते. या कृतीतून कोणालाही त्रास होणार नाही. उलट झालाच तर तुम्हाला त्याचा फायदा होणार आहे. म्हणून हा उपाय नक्कीच करून बघा.

२) मन मोकळे करा- अनेकांना प्रश्न पडतो, माझे दुःखं, माझ्या चिंता, माझे प्रश्न कोणाला सांगू? माझा कोणावरही विश्वास नाही. मात्र, मनातही साठवून ठेवता येत नाही. कोणालातरी सांगायचे, ही उर्मी स्वस्थ बसू देत नाही. अशा वेळी निःसंशयपणे तुमचे प्रश्न, काळजी, समस्या निसर्गाला सांगा. घरातल्या रोपट्यांशी, पाना-फुलाशी बोला, बागेतल्या झाडाकडे बघून त्याच्याशी संवाद साधा. अशा कृतीने लोक तुम्हाला वेड्यात काढतील, याची भीती बाळगू नका. तुम्हाला होणारा त्रास दूर करायला त्यांच्यापैकी कोणीही येणार नाही. परंतु कोणीतरी मूकपणे आपले म्हणणे ऐकून घेतले, हा आनंद मनाला समाधान आणि शांतता देईल.

३) आध्यात्मिक शक्ती वाढवा- तुमच्या वाट्याला सुख आलेले असो, नाहीतर दुःखं, ते शाश्वत नाही. प्रत्येकाची वेळ बदलत असते. वेळेनुसार परिस्थिती बदलत असते. सुखात आनंद आणि संकटात दुःखं पेलण्याची मनाची क्षमता वाढावी, म्हणून सुरुवातीपासून मनाला ध्यानधारणेची, प्राणायामाची, योगसाधनेची सवय लावून घ्या. नामःस्मरणातूनही आत्मिक आनंद प्राप्त होईल. लक्षात ठेवा. पाण्याचा पेला किती भरलेला आणि किती रिकामा आहे, यापलीकडे तो पेला तुम्ही किती काळ पकडून ठेवता, यावर तुम्हाला होणारा त्रास अवलंबून आहे. मनाचेही तसेच आहे. कोणतीही गोष्ट मनात दीर्घकाळ ठेवू नका. ते निर्मळ असणारे मन निर्मळ राहू द्या.

आपले सण संपतात पण जाताना वर्षभर पुरेल एवढी उर्जा देऊन जातात तसेच या दिवाळीचे पण आहे.ही उर्जा घेऊन सारेच ताजे तवाने राहू या हीच दिपावली समारोपा निमित्य प्रार्थना.

# नेटिझन्स - जनरेशन-झी आणि जनरेशन-अल्फा



अमोल सोनाजी मोकासे
संपर्क क्र. 9730781775

आधुनिक केसरी

**जनरेशन-झी आणि जनरेशन-अल्फा यांचा "नेटिझन्सशी" काय संबंध आहे? याचे उत्तर असे की या दोघांचा नेटिझन्स ची सरळ संबंध आहे तो म्हणजे हे दोघेही नेटीझन्स आहेत. मग नेटिझन्स आहे तरी नेमकं काय? तशी बघता ही संकल्पना खूप खोलवर आणि व्यापक आहे"नेटिझन्स म्हणजे अशी व्यक्ती जी इंटरनेटचा वापर करते किंवा अशी व्यक्ती जी त्याच्या वेळेतील बराच वेळ हा ऑनलाईन असतो". परंतु मागील काही वर्षांपासून या संकल्पनेचा सरळ-सरळ नकारात्मक वापर केला जात आहे**

भारतीय वृत्तपत्रांमध्ये वारंवार "जनरेशन-झी (GENRATION Z)" याचा उल्लेख झालेला आपल्याला बघायला मिळतो. बातम्या वाचायला मिळतात "98% जनरेशन-झी जवळ स्वतःचा स्मार्टफोन आहे!" , "66% जनरेशन-झी सतत ऑनलाईन असते!" परंतु याच दैनिकांमध्ये एक गोष्ट हरवलेली दिसते ती म्हणजे "जनरेशन-अल्फा (GENERATION ALPHA)". भारतीय प्रसारमाध्यमे जनरेशन-झी वर अती भर देताना दिसतात आणि त्याचवेळेला मात्र ते जनरेशन-अल्फा बद्दल एक शब्द सुध्दा लिहितांना, बोलतांना दिसत नाही! याचाच परिणाम म्हणजे की आपल्यातील बहुतांश लोकांना "जनरेशन-अल्फा" या शब्दाचा अर्थही माहिती नसेल, यापेक्षाही मोठे असे की बऱ्याच लोकांना हे देखील माहिती नव्हते की असा काही शब्द सुध्दा आहे आणि याचे श्रेय जाते ते प्रसारमाध्यमांना कारण त्यांनी कधी या शब्दाला वावच दिला नाही.
असो, पण या दोन शब्दांचा अर्थ तरी काय?
"जनरेशन-झी" म्हणजे अश्या पिढीतील मुले ज्यांचा जन्म हा 1997 ते 2012 या कालखंडात झालेला आहे म्हणजेच साधारणतः 10 ते 25 वर्षे वयोगटतील मुले. यांचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे हे लोक तंत्रज्ञानाशी निगडित आहे तसेच त्यांची आणि तंत्रज्ञानाची वाढ सोबत झालेली हेच सत्य. त्यांच्या काळात रोटरी फोन जवळ-जवळ कालबाह्य झाला. संगीत साठी ते कॅसेट किंवा सीडी चा वापर करत नाही तर त्यासाठी मोबाईल फोन हा आवडीचा पर्याय आहे शिवाय कॉम्प्युटर आणि I POD.
"जनरेशन-अल्फा" ही त्या पिढीतील लोकसंख्या ज्यांचा जन्म 2012 नंतर झालेला आहे आणि 2026 पर्यंत होईल. सध्या ही लोकसंख्या 10 वर्षांच्या आतीलच आहे. म्हणजेच यांची पूर्ण वाढ ही "डिजिटल" जगामध्ये झालेली आहे. ही ती मुले आहे ज्यांच्या काळात 50 पैश्यांच चलन कालबाह्य ठरले. यांचे मुख्य वैशिष्ट म्हणजे यांच्यातील आणि मशीन मधील होणारा संवाद. यांच्या साठी GOOGLE ASSISTANT, ALEXA, SIRI, BIXBY यांसारखे "कृत्रिम बुदधिमत्ता किंवा ARTIFICIAL INTELLIGENCE (AI) ह्या अतिसामान्य आणि दैनंदिन वापरातील वस्तू आहेत. तांत्रिक वस्तूंना व्हॉईस कमांड देऊन कार्यरत करणे ही अती सामान्य बाब आहे. शेवटी यांच्यासाठी स्ट्रिमिंग हा मनोरंजनाचा महत्वाचा आणि आवडीचा पर्याय आहे.
जनरेशन-झी आणि जनरेशन-अल्फा यांचा "नेटिझन्सशी" काय संबंध आहे? याचे उत्तर असे की या दोघांचा नेटिझन्स ची सरळ संबंध आहे तो म्हणजे हे दोघेही नेटीझन्स आहेत. मग नेटिझन्स आहे तरी नेमकं काय? तशी बघता ही संकल्पना खूप खोलवर आणि व्यापक आहे"नेटिझन्स म्हणजे अशी व्यक्ती जी इंटरनेटचा वापर करते किंवा अशी व्यक्ती जी त्याच्या वेळेतील बराच वेळ हा ऑनलाईन असतो". परंतु मागील काही वर्षांपासून या संकल्पनेचा सरळ-सरळ नकारात्मक वापर केला जात आहे जसा की "नेटिझन्स म्हणजे ज्याला इंटरनेट चे व्यसन आहे तो" म्हणूनच पहिल्या व्याख्येनुसार जनरेशन-झी आणि जनरेशन-अल्फा हे दोघेही या व्याख्येचे दाखले आहेत. या दोन्ही जनरेशन मध्ये सामाईक घटक म्हणजे दोघेही इंटरनेटचा वापर करतात, खूपच अधिक करतात!
ह्या नेटिझन्सना इतरही नावे आहेत जसे की 'सायबर सिटिझन', 'सायबरनॉट', 'सायबेरियन', 'इन्फोनॉट', इत्यादी. यांना इंटरनेट शिवाय राहणे थोडे अवघड कारण तो त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेला आहे. ते म्हणतात ना इंटरनेट ही दुधारी तलवार आहे - एकीकडे या इंटरनेट ने जग व ज्ञान माणसाच्या इतकं जवळ आणले की कधीच नव्हते आणि दुसरीकडे आल्या त्यासोबत नको त्या बाबी व सवयी! म्हणूनच की काय नेटिझन्स बनल्यानंतर काही नियम किंवा सावधगिरी बाळगायला हवी!
सर्वात पहिली आणि अत्यंत महत्वाची सावधगिरी म्हणजे इंटरनेटवर असताना आपली व इतरांची



गोपनीयता (PRIVACY) जपता आली पाहिजे. आता नवीन स्मार्टफोनमध्ये एक फीचर आले आहे ज्याद्वारे ऑनलाईन किंवा सोशल मीडियावर एखादा फोटो किंवा व्हिडिओ शेअर करताना त्याच्यातील "मेटाडाटा" हा पुसल्या अथवा डिलीट केला जातो. मेटा डाटा म्हणजे असा डाटा जो गुप्त आहे उदाहरणार्थ फोटो टाकल्यानंतर एखाद्या हॅकरणे त्या फोटोचा मेटाडाटा उघड केला तर त्या डाटा चा उपयोग करून त्या फोनचे लोकेशन गुगल मॅप वरती शोधता येते, या डाटा चा उपयोग करून इतरही बऱ्याच गोष्टी शक्य आहेत ज्या सर्वसाधारण व्यक्तीसाठी हानिकारक ठरू शकतात म्हणूनच गोपनीयता तुमची असेल अथवा समोरच्याची तिचे संरक्षण करता आलेच पाहिजे.
दुसरी काळजी म्हणजे कोणतेही ॲप किंवा सोशल मीडियावरील अकाउंट साइन अप करताना डोळे झाकून एग्रीमेंट मान्य करू नये. फेसबुकच्या अटीनुसार त्याच्यावर तुम्ही अपलोड केलेला एखादा फोटो अथवा व्हिडिओ हा फेसबुकच्या मालकीचा होतो याचा अर्थ फेसबुक कोणत्याही क्षणाला कोणत्याही वापरासाठी तुमचा फोटो किंवा व्हिडिओ तुमच्या परवानगीशिवाय वापरू शकते आणि जर तुम्ही तुमचे अकाउंट डिलीट केले तरीसुद्धा तुम्ही अपलोड केलेले फोटो आणि व्हिडिओ फेसबुक वापरू शकते तेही कायदेशीर पद्धतीने त्यामुळे लायसन्स एग्रीमेंट किंवा जनरल एग्रीमेंट डोळे झाकून मान्य करू नये.
तिसरी सावधगिरी अत्यंत महत्त्वाची ठरते कारण आता नवीन धडाका सुरू झालेला आहे यामध्ये तुम्ही साधा गेम जरी इन्स्टॉल केला तर त्यासाठी तुम्हाला खूप साऱ्या परवानग्या द्याव्या लागतात जसे की तुमच्या फोनचा स्टोरेज, लोकेशन, संपर्क, मायक्रोफोन, एसएमएस इत्यादी. शंका अशी की मला जर गेम खेळायचा त्यासाठी माझा मायक्रोफोन, लोकेशन, संपर्क, एसएमएस इत्यादींची आवश्यकता काय? त्यामुळे कोणतेही ॲप इंस्टॉल केल्यानंतर ज्या परमिशन आवश्यक असतील त्याच द्या आणि शक्यतो लोकेशनची परवानगी ॲप वापरत्या वेळीच द्या अन्यवेळी लोकेशन ऑफ ठेवा.
चौथी सावधगिरी म्हणजे प्रत्येक ॲपमध्ये एक ऑप्शन आहे जो आपोआप तुमच्या परवानगीशिवाय ऑन झालेला असतो तो म्हणजे "बॅकग्राऊंड डाटा". तुमचं ॲप चालू ठेवण्यासाठी या परवानगीची आवश्यकता नाही त्यामुळे तुम्ही तुमच्या ॲप्स मध्ये जाऊन हा ऑप्शन बंद ठेवावा कारण याचा वापर करून बऱ्याच वाईट गोष्टी साध्य करणे सहज आहे. भारत सरकारने वेळोवेळी इतर देशातील खास करून चीनमधील ॲप्स वरती बंदी घातलेली आहे कारण या ऑप्शनचा वापर करून त्या ॲप्स द्वारे तुमच्या फोनमधील डाटा चोरी केला जात होता. शक्य तेवढ्या ॲप्स मधून "बॅकग्राऊंड डाटा" बंद ठेवावा.
पाचवी सावधगिरी सोपी आणि आपल्याच ताब्यातील आहे. तुम्हाला गरजेचे असेल तेच ॲप तुमच्या फोनमध्ये ठेवा अन्य ॲप्स ज्यांचा तुम्ही पंधरा दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी वापर केला नाही ते त्वरित अनइन्स्टॉल किंवा डिलीट करा. ॲप्स इन्स्टॉल करताना ते खात्रीशीर आहे का हे तपासून बघा, त्याची ओरिजिन म्हणजेच तो कोणत्या देशातील आहे हे बघा, ते ॲप खात्रीशीर वेबसाईट वरून डाऊनलोड केलेले आहे का हे बघा आणि त्या ॲपला वापरण्यासाठी काही लायसन्स आहे का हे सुद्धा पडताळून बघा. ह्या गोष्टी लक्षात न घेता तुम्ही ॲप्स इन्स्टॉल केले तर तुम्हाला त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात. **(उर्वरित पुढील अंकात)**

# गरिबीला अंत नाही, महागाईला खंत नाही



लक्ष्मण वाल्डे
संपर्क क्र. 8888606068

आधुनिक केसरी

**आजच्या या धावत्या युगात खिसे जरा लवकर-लवकर रिकामे होत आहे. तोंडाच पाणी पळाव तस महागाईच्या तोंडाला चटका लागला आहे. दहा रुपयाच्या जागी आता शंभर रुपयाची नोट लागायला लागली आहे. म्हणजे दहाच्या पटीत महागाईन डरकाळी फोडली आहे. खिशाला न परवडणारे हे जगणे आज बड्या मुश्किलीन काढाव लागत आहे. आज महागाईन सध्याला जबडाच फाडला आहे. आणि गरिबीन डोक्यावर कुंटलाच ओझ ठेवावं तस महागाई गरिबीच्या बोकांडी येऊन बसली आहे.**

दिवसानं-दिवस रोजंदारी कमी नि महागाई जिभेला चटका लागावी तशी.हा असाच महागाईचा तांडव चालू राहिला तर ह्या अधोगतीकडे फरफटीत नेणाऱ्या या वाटेवर अन्न, वस्त्र, निवारा हा मुलभूत विकास खुटून पोटभरणे कठीण होईल असं आता वाटायला लागलं आहे.गरिबी आणि महागाई आटोक्यात आणण हे कोणत्याच सरकारच्या चुटकीच काम नाही. असच जानवायला लागलं आहे.दिवसान दिवस महागाई चौफेर थिंग्या पेटवत चालली आहे.उभ्या आयुष्यात पाहिलेले स्वप्ने डोळ्यातच थिजायला लागली आहे.पोटाला पोटभर खाणे ही आज लय अवघड बनले आहे.महागाई नुसती तांडव करत सुटली आहे.महागाई जनु अंगारच बनलेली आहे. हाताशी लालबुंद तापलेली सळई येऊन चरकन हात भाजावा.आज तशी महागाईत आणि गरीबीत जिवन भाजून निघायला सुरुवात झालेली आहे.
या आग ओकणाऱ्या महागाई पुढे हाताला लागणाऱ्या कामाधंद्यातून मिळणारा मोबदला पुरेसा हातभार लावतांना आज दिसत नाही.कितीही दिवस रात्र काम करा कितीही रात्र-पाळ्या करा पण सगळंच जिथल्या तिथं येऊन सांडतय.महागाईचा भडका डोळ्यात खुपतोय जीव तिळ-तिळ जळतोय.या अशा महागाईच्या विद्रूप रुपापाई नशीबी आलेलं दारिद्र्य पिढ्यानपिढ्या घटण्याऐवजी वाढत चाललेल आहे.अस जर चालत राहिलं तर एक दिवस अन्न ,वस्त्र,निवारा यात फक्त अन्न मिळवण शक्य झालं तर होईल नाहीतर त्याचीही शक्यता वर्तवता येत नाही.
आज काम देणारा म्हणतो जास्त पगार द्यायला परवडत नाही.खायापायच्या वस्तुवर,जिवन उपयोगी वस्तुवर जी.एस.टी.लावून-लावून महागाई गगनाला भिडवलेली दिसतीये.पेट्रोल,डिझेल,गॅस,तेल,वीज, किराणा,दूध,औषधी,मोबाईल रिचार्ज,दवाखान्यांची फिस,शाळा-कॉलेजांच्या फिस,बस भाडे, वह्या-पुस्तके शैक्षणिक साहित्य,जनावारांचे खाद्य, शेतकऱ्यांचे खत,बी-बियाणे,शेती अवजारे,टोल नाक्यांचे टोल, घरगुती वस्तुंचे दर,अंगावरच्या कपड्यांचे दर,घर बांधकामांसाठी लागणार सिमेंट,लोखंड तसेच जमिनीचे भाव,घरांचे,प्लॉटचे भाव,गगनाला भिडतांना दिसत आहे.यावर एकदाचा अनोखा रामबाण तोडगा निघालाच पाहिजे.
गरिबीच्या डोक्यावर हुकुमशाही गाजवणारा महागाईचा मस्तावलेला फेट्याला जी.एस.टी.चा लावलेला तुरा चुरमळला गेला पाहिजे.महागाईच हे दुःखनं अंगाशी घुसल असून जगण्याला पिळ पडला आहे.आजच्या या महागाईच्या काळात पाचशे रुपयांची नोट भुरकून खिशातून उडून जाते. मनी भरणार नाही एवढासा बाजार एका पिशवीत ही निट येत नाही.एक काळ असा होता पन्नास रुपयांचा बाजार पाच-पाच पिशातही मावत नसे. आता तर उलटच दिसतंय.पाच पैशे,दहा पैसे,वीस पैसे,चार आणे,आठ आणे,बारा आणे काळानुसार अशा पैशाचा जमाना जुनाट झाला आणि आता तर या नव्या जमान्यात नवा काळ नवी भाषा.आता तर रुपयांची,लाखांची,करोडांची भाषा बोलायला लागला आहे आज हा नवा काळ.जून्या काळात रोजंदारी कमी होती पण त्या पैशाच मुल्य अधिक होत. आज रोजंदारी जास्त आहे पण पैशाचं मुल्य कमी झालेलं दिसतंय.फाकलेली अर्थ व्यवस्था दारिद्रीला आमंत्रण देत आहे.आज पैशाची किंमत कमी बाजार मालांचे मुल्य अधिक झालेले दिसत आहे.वस्तुचे भाव विस्तवा सारखे पेटलेले दिसायला लागले आहे. भंगारच्या भावात आयुष्य विकाव तशी गत आज या महागाईन आणि महागाई मुळे येणाऱ्या या गरिबी मुळे झाली आहे.आता तर असं वाटायला लागलं की उभं आयुष्य आता महागाईच्या आणि गरिबीच्या ताटाखालच मांजर होऊन जगावं लागणार कि काय ..? अशा या भितीन मनात धाक उभा केला आहे. सामान्य लोकांची आशा-अपेक्षा इरत चालली आहे. आमचच दुःख आमच्याच डोळ्यात खुपत चालल आहे.पाठीला वाक पडावा.पोटाला पिळा पडावा एवढं मोठं महागाईच ओझं मड्यावर पडायला




लागल आहे.या महागाईचा वनवा वेळेत विझवला तर ठिक,नाहीतर सगळंच जळून खाक होणार! आयुष्याला लागलेलं गरिबीच किडं,जीव पोखरायला लागला आहे.जसं पाणी आडवा पाणी जिरवा.झाडे लावा झाडे जगवा.तसच आता महागाई घटाओ गरीबी हटाओ ।
डोक्यात केस नाही त्या पेक्षा जास्त दारिद्रीच्या हाराळी उभ्या आयुष्यावर उगवून येतांना,आपल्या माणसाच्या जन्मावर हसत आहे.आणि हि महागाई म्हणत आहे जो वर मी आहे तोवर तुम्हांला तुमच भाग्य लिहू देणार नाही कारण ते लिहण सद्या माझ्या हातात आहे.अस जर चालू राहिलं तर आपलं होणार,"जन्मी आला हेला आणि पाणी वाहू-वाहू मेला."कपाळ जरी करंट,पांढर दिसत असलं तरी मजकूर मात्र कोरल्या गेला आहे.हातावर काम धंदे करत असलेले लोक जीवंत असून मेल्यागत जगतांना दिसत आहे.या महागाईच्या आणि गरीबीच्या बंद दाराआड कोंडवाड्यात मर-मर मरत असतांना दुःखात भिजलेलं आयुष्य अश्रू होऊन सांडत असतांना होणाऱ्या वेदना पावला पावली हृदयात खुपतात."पाखरा वाणी वखरा मागे चरतांना दिसताय."महागाई मागे गरीबी आणि गरीबी मागे बेरोजगारी.
यावर तोडगा म्हणजे हाती घेतली जशी स्वच्छता मोहीम तशी.जसा आहे सरकारचा नारा "सबका साथ-सबका विकास" तसाच तर "गरीबी हटाव इन्सान बचाव।"या महागाईला वेळेत नाही बांधले ना...,मग अधोगतीचा स्फोट झाल्याशिवाय राहणार नाही.जशी आज दहावी,बारावीतली पोर.त्याच उंचीचे पोर पहिलीला,पाचवीला वाटायचे.आज दहावी-बारावीच्या वर्गात शिकताय.अशा या पद्धतीन आपली आर्थिक परिस्थिती खुटत चाललेली दिसत आहे.
आज जर वेळेत महागाईला खुट्याला बांधल नाही. तर उद्याला त्याच महागाईला सांखळदंडात बांधन शक्य होणार नाही.आधीच चोऱ्या-माऱ्या वाढल्या आहे.बाकी गुन्हे वाढायला वेळ लागणार नाही.आज डबक्या एवढी समस्या उद्याला आसमाना एवढी बलाढ्य व्हायला वेळ लागणार नाही.

***"जिंदगी जीने दो यारों ।
उसे बेचने ना लगाओ ।"
"जिंदगी भगवान की देन है ।
उसे धंदा मत बनाओ।"
"मंहगाई से जन्मी गरीबीं को
बेरोज़गारी ने बढावा दिया है ।"
"मंहगाई ने तांडव किया ।
रोजनदारीने घात किया ।"
"मंहगाई और गरीबी की बुरी छांव
लिपट रही है देश हमारा ।"***

देशाच्या कोपऱ्या कोपऱ्यात सुख, शांती, समृद्धी, पाहिजे असेल तर रिकाम्या हातांना कामे द्या.कामाचा चांगल्यात चांगला मोबदला द्या.नवीन उद्योजक होऊ पाहणाऱ्यांना आर्थिक साह्य लवकर आणि जास्तीत जास्त द्या. ते मुद्रा संकल्पनेतून का होईना?नवीन उद्योजकांच्या मालाला कायमस्वरूपी विक्री आणि योग्य दर द्या.अशाने गरीबी तळा गळात नेऊन सोडता येईल आणि कायमची माती टाकून पुरता येईल.जीवनावश्यक वस्तूंवरचा कर कायमचा काढून टाकला गेला पाहिजे.कामाचा,हिशोबात मिळणाऱ्या मोबदल्यातून महागाईला सहज हरवता येईल.तेव्हा सगळ्यांच्या जीवनात हरवलेला सुखाचा,आनंदाचा सूर नव्याने साद घालेल.

# माजलगावमध्ये साडेतीन हजार तरुण सुरक्षा रक्षक नोकरीसाठी पात्र

## ओमप्रकाश शेटेंच्या पुढाकारातून ग्रामीण तरुणांसाठी रोजगाराचा यज्ञच

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** काम मिळवण्यासाठी वणवण भटकण्याच्या काळात थेट घरापर्यंत जाऊन हजारो तरुणांना नोकरी देण्याचा प्रयत्न ओमप्रकाश शेटे यांच्या पुढाकारातून माजलगावमध्ये केला जात आहे. एकाच दिवशी नोंद झालेल्या सात हजारापैकी साडेतीन हजार तरुण सुरक्षा रक्षकाच्या नोकरीसाठी पात्र झाले आहेत. देशातील विमान तळासह वेगवेगळ्या ठिकाणी सुरक्षा रक्षक पुरवणारी नामांकित कंपनी पात्र तरुणांना उत्तम प्रशिक्षण देऊन रोजगार देणार आहे. प्रशिक्षणामुळे तरुणांना पोलिस आणि सैन्य दलाच्या भरतीसाठीचाही मार्ग सुकर होणार असल्याने ग्रामीण भागातील दहावीपर्यंत शिकलेल्या तरुणांच्या आयुष्यात नवी संधी निर्माण करणारा महामार्गच ठरणार आहे. बीडसह राज्यभरात दरवर्षी दहावीसह पदवी घेऊन लाखोंच्या संख्येने विद्यार्थी नोकरीच्या शोधात वेगवेगळे मार्ग शोधतात. सरकारी क्षेत्रात नोकरीच्या संधी कमी झाल्याने आणि बेरोजगार तरुणांची संख्या वाढत चालल्याने खाजगी क्षेत्रातही पडेल ते आणि मिळेल त्या पगारात काम करण्यासाठी तरुणांना वणवण भटकावे लागते. ग्रामीण भागात दहावी नंतर आर्थिक परिस्थितीमुळे मोठ्या संख्येने मुलं पुढील शिक्षण घेऊ शकत नाहीत. परिणामी



पारंपारीक शेती, मजुरी करण्याशिवाय पर्याय राहत नाही. तर काही मुले शहरात तालुक्याच्या ठिकाणी व्यापाऱ्यांकडे पाच ते सात हजार रुपये महिना पगारात पडेल ते काम करतात. शारीरीक आणि बौध्दीक क्षमता असतानाही केवळ संधी नसल्यामुळे ग्रामीण भागात बेरोजगारांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. अशा परिस्थितीत ओमप्रकाश शेटे यांनी बेंगलोर येथील सुरक्षा रक्षक पुरवणाऱ्या रक्षा कंपनीच्या माध्यमातील माजलगाव तालुक्यातील तरुणांना त्यांच्या क्षमतेनुसार काम देण्यासाठी रोजगार मेळावाच भरवला. कंपनीच्या व्यवस्थापनाला माजलगावात आणून तरुणांची नोंद करुन घेतली. पालकमंत्री अतुल सावे आणि खासदार डॉ.प्रितम मुंडे यांच्या हस्ते शुभारंभ केल्यानंतर तीन दिवसात तब्बल सात हजार तरुणांनी सुरक्षा रक्षक होण्यासाठी नोंद केली. यातील साडेतीन हजार तरुण पात्र झाले असुन टप्प्या टप्प्याने या तरुणांना बेंगलोर येथे कंपनीच्या वतीने एक महिन्याचे प्रशिक्षण देऊन देशभरातील विमानतळ व इतर सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांमध्ये सुरक्षा रक्षकाची नियुक्ती दिली जाणार आहे. दहा हजार ते पंधरा हजारापर्यंत महिना

**तरुणांना नोकरी दिल्याचे समाधान–ओमप्रकाश शेटे**



ग्रामीण भागातील तरुणांना शिकल्यानंतरही नोकरीसाठी वणवण भटकावे लागते. अशा परिस्थितीत या तरुणांपर्यंत नोकरीची संधी आणून त्यांच्या हाताला काम देण्याचा प्रयत्न मी करू शकलो याचे समाधान आहे. एखाद्या व्यक्तीच्या माध्यमातून हजारोच्या संख्येने एकाचवेळी तरुणांना काम देण्याचा प्रयत्न पहिल्यांदाच झाला असल्याने आयुष्यातील मोठा आनंद आहे.

**तरुणांचा आत्मविश्वास वाढणार–बंडू खांडेकर**

सुरक्षा रक्षकासाठी पात्र झालेल्या साडेतीन हजार तरुणांना बेंगलोर येथील रक्षा कंपनीत एक महिन्याचे प्रशिक्षण मिळणार आहे. त्यामुळे तरुणांमध्ये आत्मविश्वास वाढेल आणि भविष्यात ते नव्या संधी मिळवतील. काही वर्षापूर्वीच सुरक्षा रक्षक म्हणून कामावर गेलेले तरुण पंचवीस ते तीस हजारापर्यंत पगार घेत आहेत. तर काहींनी अनुभवाच्या बळावर सरकारी नोकऱ्यांमध्ये संधी मिळवली असल्याचे देवदूत प्रतिष्ठाणचे अध्यक्ष बंडू खांडेकर यांनी सांगितले.

पगार व राहणे आणि खाण्याची सोयही कंपनी करणार आहे. चांगले प्रशिक्षण मिळाल्यामुळे सुरक्षा रक्षकाची नोकरी करताना तरुणांचे मनोबल वाढून त्यांना पोलिस आणि सैन्य दलातील भरतीसाठीचाही मार्ग सुकर होणार आहे. यापूर्वी सुरक्षा रक्षक म्हणून कामाला गेलेल्या अनेक तरुणांनी या अनुभवाच्या बळावर सरकारी नोकऱ्या मिळवल्या आहेत. एकाच तालुक्यात एकाच वेळी हजारोच्या संख्येने ग्रामीण तरुणांना रोजगार मिळवून देण्याची ही पहिलीच वेळ आहे. देवदूत प्रतिष्ठाणचे अध्यक्ष बंडू खांडेकर आणि रमादेवी संस्थेचे शिवाजी रांजवण यांनी हा रोजगार मेळावा यशस्वी करण्यासाठी मोठे परिश्रम घेतले. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात आरोग्य सहाय्यता कक्षाचे प्रमुख ओमप्रकाश शेटे यांनी खेड्यातील गरीब माणसालाही शासकीय योजनेतून आणि थेट आर्थिक मदतीतून उच्च दर्जाचे उपचार मिळवून दिले. यामुळे राज्यभर त्यांची आरोग्य देवदूत म्हणुनच ओळख आहे. आरोग्याचे काम करत असतानाच ग्रामीण भागातील बेरोजगारीचे निर्माण झालेले भयावह चित्र कमी करण्यासाठी आणि तरुणांना सन्मानाने जगता यावे यासाठी हक्काची नोकरी आणि त्यातून नव्या संधी निर्माण करण्याचा प्रयत्न शेटे यांनी केला आहे. सरकार नोकरभरतीची घोषणा करते, प्रत्यक्षात मात्र वय संपले तरी भरत्याच होत नाहीत. अशा परिस्थितीत ओमप्रकाश शेटे यांनी मात्र थेट घरापर्यंत जाऊन तरुणांना नोकरी देण्याचा प्रयत्न केला आहे.



# गंगापूर पोलीस मित्र संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी रामेश्वर टाके

आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** पोलीस मित्र संघटनेच्या गंगापूर तालुकाद्यक्षपदी लासूर स्टेशन येथील रामेश्चर सारंगधर टाके यांची निवड करून त्यांना आज शिल्लेगाव पोलीस ठाणे हद्दीतील लासूर स्टेशन पोलीस चौकीत पोलीस मित्र संघटनेचे संस्थापक अद्यक्ष कांबळे, सुशांत गुरवे महाराष्ट्र प्रदेशाद्यक्ष,कमलेश शेवाळे मुख्य महासचिव यांच्या आदेशाने औरंगाबाद जिल्हाद्यक्ष भानुदास साळुंके, मजनु पठाण जिल्हा  संपर्क प्रमुख, विलास पाटील कुहीले वैजापुर तालुका अध्यक्ष यांच्याहस्ते योगेश गवळी, गणेश झिंजूर्डे पोलीस विभागाचे पियुष राजपूत, पोलीस अंमलदार गोंडे यांच्या उपस्थितीत देण्यात आले. रामेश्वर टाके यानी पोलीस मित्र संघटनेच्यावतीने दिलेल्या पदाची जबाबदारी सांभाळून संघटनेची ध्येय,धोरणे  राबवून पोलीस बांधवासोबत सामान्य नागरिकांच्या समश्या सोडवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

# एअर इंडिया आणि एअर एशिया इंडिया कंपनीचे विलिनीकरण होणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** टाटा समूहाकडे मालकी आल्यानंतर एअर इंडियाकडून मोठे निर्णय घेतले जात आहेत. एअर इंडिया आणि एअर एशिया इंडियाच्या विलिनीकरणाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पुढील वर्षी, 2023 च्या अखेरीस याचे विलिनीकरण होण्याची शक्यता असल्याचे वर्तवण्यात आले आहे. टाटा समूहाच्या एअर इंडियाने एअर एशियामध्ये 100 टक्के भागीदारीसाठी करार केला आहे. एअर एशिया इंडिया हा टाटा सन्स आणि एअर एशिया इन्व्हेस्टमेंट लिमिटेड यांचा संयुक्त उपक्रम आहे. यामध्ये टाटा सन्सचा वाटा 83.67 टक्के आणि एअर एशिया इन्व्हेस्टमेंटचा 16.33 टक्के वाटा आहे. एअर इंडियाने दिलेल्या माहितीनुसार, विलिनीकरण 2023 च्या अखेरीस होऊ शकते. या माध्यमातून परवडणाऱ्या दरात विमान सेवा पुरवणारी एअरलाइन कंपनी तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. विलिनीकरणानंतर निर्माण होणाऱ्या नव्या कंपनीचे नाव 'एअर इंडिया एक्सप्रेस' असे असणार आहे. दरम्यान, एअरएशिया कंपनी 2014 मध्ये सुरू झाली होती. तर, एअर इंडिया एक्सप्रेसची 2005 मध्ये विमान सेवा सुरू झाली होती. एअरएशिया इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेस या दोन एअरलाइन्सच्या विलिनीकरणाची प्रक्रिया पुनर्रचना योजनेचा भाग म्हणून केली जात आहे. या प्रक्रियेला सुमारे 12 महिन्याचा कालावधी लागणार असल्याचे म्हटले जात आहे. तत्पूर्वी, मलेशियन एअरलाइन एअरएशिया कंपनीने एका निवेदनात म्हटले आहे की, एअरएशिया इंडिया विमान कंपनीत असणारा आपला उर्वरीत हिस्सा एअर इंडियाला विकण्यासाठी करार केला आहे.

एअरएशिया एव्हिएशन ग्रुप लिमिटेडने सांगितले की, एअरएशिया इंडियामध्ये असणारा उर्वरीत हिस्सा एअर इंडियाला विकण्यासाठी एक शेअर करार केला आहे. भारतीय स्पर्धा आयोगाने या वर्षी जून महिन्यात एअर इंडियाद्वारे एअरएशिया इंडिया कंपनी खरेदी करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली.




# नांदेडकरांनी लुटला कलामंदिरमध्ये क्रिकेट सामन्याचा आनंद

## ६ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता भारत विरुद्ध झिम्बाब्वे हा  सामना मोठ्या पडद्यावर मोफत दाखवण्यात येणार

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** क्रिकेट विश्वचषकातील सर्व सामन्याचे प्रक्षेपण अतिशय स्पष्ट व भव्य पाहून स्टेडियम मध्ये बसल्याचा आनंद लुटत शेकडो क्रीडा रसिकांनी प्रचंड प्रतिसाद देत कलामंदिरमध्ये धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर व सुरेश लोट यांनी लावलेल्या मोठ्या पडद्यावर सामना पाहण्याचा आनंद लुटला.  भाजपा नांदेड महानगर व कलामंदिर ट्रस्ट तर्फे हिंदुस्तान विरुद्ध बांगलादेश हा सामना मोठ्या पडद्यावर दाखवण्याचा शुभारंभ प्रतिष्ठित उद्योजक सतीश सुगंचदजी शर्मा यांच्या हस्ते तर प्रतिष्ठित व्यापारी योगेश जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष प्रवीण साले, जिल्हा सरचिटणीस विजय गंभीरे, अशोक पाटील धनेगावकर, व्यंकट मोकले, मंडलाध्यक्ष आशिष नेरळकर, भालचंद्र पत्की, सूर्यकांत कदम, मारोतराव वाघ, सोशल मीडिया जिल्हा संयोजक राज यादव, सहकार आघाडी जिल्हाध्यक्ष संतोष परळीकर, युवा मोर्चा प्रदेश चिटणीस अनिल बोरगावकर, कामाजी सरोदे



यांची प्रमुख उपस्थिती होती. शेवटच्या चेंडूपर्यंत रंगलेल्या या सामन्याचा दर्शकांनी पुरेपूर लाभ घेतला. भारताच्या प्रत्येक चौकार आणि षटकाराला प्रचंड दाद दिली. पावसामुळे व्यत्यय येईपर्यंत बांगलादेशचे पारडे जड होते. पण नंतर टिचून गोलंदाजी करून मिळवलेल्या प्रत्येक बळींचे स्वागत करताना नाचून सभागृह डोक्यावर घेतले. अंतिम चेंडूवर झालेल्या भारताच्या विजयाचे शेकडो क्रीडा रसिकांनी प्रचंड जल्लोषात  स्वागत केले. तिरंगे झेंडे हातात घेऊन अनेक जण उत्साहात भांगडा करत होते. सामना संपल्यानंतर कलामंदिर परिसरात फटाक्यांची प्रचंड आतिषबाजी करण्यात आली. यापूर्वी हिंदुस्तान विरुद्ध नेदरलँड हा सामना देखील मोठ्या पडद्यावर दाखविण्यात आला होता.त्याचा शुभारंभ भाजपा मराठवाडा प्रदेश संघटन मंत्री संजय कोडगे यांच्या हस्ते करण्यात आला. अध्यक्षस्थानी विरोधी पक्ष नेते दीपकसिंह रावत हे तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाध्यक्ष प्रवीण साले, संघटन सरचिटणीस विजय गंभीरे, जिल्हा सरचिटणीस अशोक पाटील धणेगावकर व व्यंकट मोकले, जिल्हा उपाध्यक्ष अनिलसिंह हजारी व शितल खांडील,कामाजी सरोदे, भास्कर हंबर्डे,प्राचार्य बालाजी गिरगावकर, शंकरराव मनाळकर,अनिल जगताप हे उपस्थित होते. हा सामना जिंकल्यामुळे क्रीडा रसिकांनी समाधान व्यक्त केले. त्यानंतर मात्र दक्षिण आफ्रिके विरुद्ध झालेला भारताचा झालेला पराभव सर्वांच्या जिव्हारी लागला. या सामन्याचे उद्घाटन भाजपा वैद्यकीय आघाडी जिल्हा संयोजक डॉक्टर सचिन उमरेकर यांच्या हस्ते व नगरसेवक दिलीपसिंग सोडी यांच्या अध्यक्षतेखाली प्रक्षेपण करण्यात आले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष प्रभू कपाटे, बालाजी गिरगावकर,चक्रधर उमरेकर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. सामने दाखवण्यासाठी आशिष मेश्राम, प्रवीण सुनेवाड, संतोष भारती, प्रदीपसिंह हजारी, धीरज स्वामी, कपिल यादव, करण जाधव, सदाशिव कंधारे, सुनील वाघमारे, महेंद्र शिंदे, आकाश गायकवाड, विलास जोगदंड, विजय वाडेकर हे परिश्रम घेत आहेत. दि.६ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता भारत विरुद्ध झिम्बाब्वे हा  सामना मोफत दाखवण्यात येणार आहे.कलामंदिर मध्ये आसन व्यवस्था मर्यादित असल्यामुळे सुरुवातीला येणाऱ्यांना प्रथम प्रवेश दिला जाणार आहे.त्यामुळे क्रिडाप्रेमींनी व तरूणांनी वेळेवर येऊन या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन भाजपा जिल्हा सरचिटणीस ॲड.दिलीप ठाकूर व कामगार आघाडीचे सुरेश लोट यांनी केले आहे.

# कडाक्याच्या थंडीत गटविकास अधिकारी घरकुल लाभार्थ्यांच्या दारात

## अपूर्ण घरकुल पूर्ण करण्याबाबत गट विकास अधिकारी यांनी प्रत्यक्ष घरकुल लाभार्थ्यांच्या भेटी केले मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायत बनशेंद्रा ,शिरसगाव, चापानेर येथे प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना अंतर्गत अपूर्ण घरकुले व प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण सन 2021-22 मध्ये मंजुरी दिलेल्या परंतु पहिल्या हप्ता करिता कागदपत्र दिलेली नाही अशा लाभार्थ्यांच्या व ज्यांना पहिला हप्ता वितरित केला परंतु घरकुल सुरु केले नाही अशा सर्व लाभार्थ्यांच्या घरी भेटी देऊन घरकुल सुरु करण्या बाबत व अपूर्ण घरकुल पूर्ण करण्या बाबत मा. गट विकास अधिकारी चंद्रहार ढोकणे यांनी प्रत्यक्ष घरकुल लाभार्थ्यांच्या भेटी घेऊन सूचना दिल्या, मार्गदर्शन केले. सध्या तालुक्यात अधिकारी व कर्मचारी औरंगाबाद येथुन ये जा करणा -यांनी गटविकास अधिकारी यांच्या कडुन शिकण्यासारखे खुप आहे यांचा आदर्श घ्यावा अश्या चर्चेला उधान येत आहे आपण शासकीय सेवेत रूजु आहे आपल ही समाजा साठी काही देण आहे असे उत्तम उदाहरण ढोकणे यांनी दाखवुन दिले आहे तालुक्यात गटविकास अधिकारी यांचे सर्व स्तराहुन कौतुक होत आहे . यावेळी विस्तार अधिकारी संतोष दारकुंडे, एन डी डोंगरे सर, ग्रामसेवक संघटनेचे तालुकाध्यक्ष योगेश धाटबळे, बी आर सी, संदीप चव्हाण, नागेश किरतकर, उमेद अभियान अंतर्गत संदीप जाधव तसेच पंचायत समितीतील ग्रामीण गृह निर्माण अभियंता, ऑपरेटर उपस्थित होते तसेच स्वच्छ भारत मिशन अंतर्गत गुड मॉर्निंग पथक द्वारे लोकांना स्वच्छतेचे नियमित वापर करा उघड्यावर कोणीही जाऊ नका याबाबत जनजागृती केली व महिला स्वयं सहायता समूह यांना भेट दिली व मार्गदर्शन केले प्रसंगी आर ए पगारे ग्राम विकास अधिकारी, कोकणी ग्रामसेवक, सरपंच, सदस्य घरकुल लाभार्थी उपस्थित होते.



# मत्स्यव्यवसाय आयुक्तस्तरावर समिती: सुधीर मुनगंटीवार



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मत्स्य व्यवसायातील अडचणी सोडविण्यासाठी तसेच विकासात्मक आणि धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मत्स्य व्यवसाय आयुक्त स्तरावरील समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले. राज्यातील गोडया पाण्यातील मच्छिमार सहकारी संस्थांच्या समस्या सोडविण्याबाबत बैठक आज सह्याद्री अतिथीगृह येथे मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला आमदार परिणय फुके, मत्स्य व्यवसाय विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष प्रकाश लोणारे, सदस्य बंडु हजारे, सहकार भारतीचे वासुदेव सुरमुसे यांच्यासह मच्छिमार समितीचे सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते.

मुनगंटीवार म्हणाले की, राज्य शासनामार्फत यापूर्वीच मत्स्य व्यवसायातील अडचणी दूर करण्यासाठी जिल्हास्तरावर समिती स्थापन करण्यात आलेली आहे. नव्याने आयुक्त स्तरावरील समिती दर तीन महिन्यांनी जिल्हा समितीमार्फत केलेल्या कामांचा आढावा घेण्याबरोबरच या सामितीसमोर येणारे प्रश्न निकाली काढेल.महाराष्ट्र राज्य मच्छिमार (गोडया पाण्यातील )कल्याण विकास मंडळ स्थापन करुन यासाठी 100 कोटी रुपयांची तरतुद करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष प्रकाश लोणारे यांनी यावेळी मांडली. मात्र याबाबत श्री. मुनगंटीवार म्हणाले की, मंडळ स्थापन करुन असे प्रश्न सुटणार नाहीत. त्यामुळे असे कल्याण विकास मंडळ दुसऱ्या राज्यांमध्ये आहे का याचा अभ्यास करण्यात येईल, तसेच या मंडळाची कार्यप्रणाली कशी आहे हे सुध्दा तपासून घेण्यात येईल. अशा प्रकारचे मंडळ महाराष्ट्रात स्थापन करावे का याबाबत एक समिती करण्यात यावी. या समितीमध्ये मत्स्यविकास विभागाचे संबंधित अधिकारी आणि मच्छिमार प्रतिनिधी यांचा समावेश करण्यात यावा. सदर समितीने येत्या दोन महिन्यात याबाबत अहवाल शासनास सादर करावा असेही मुनगंटीवार यावेळी म्हणाले.

मच्छिमार सहकारी संस्थांना मत्स्यबीज संचयन करण्यासाठी पॅकेज देणे किंवा यापूर्वी असे काही पॅकेज राज्य शासनामार्फत देण्यात आले होते का याबाबतही अभ्यास करण्यात यावा. याशिवाय जिल्हा मच्छिमार सहकारी संघाना प्रशासकीय तसेच व्यवस्थापकीय खर्च कराण्यासाठी दहा लाख रुपये अनुदान देणे याबाबतचा अभ्यास विभागामार्फत करण्यात येईल. अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे मासेमारीचे नुकसान झाले आहे त्यांना प्रति हेक्टरी आर्थिक मदत देण्याबाबत वस्तुनिष्ठ माहिती घेतल्यानंतर निर्णय घेण्यात येईल असेही मुनगंटीवार यांनी यावेळी सांगितले.

# जेजुरीत ८ नोव्हेंबर रोजी राज्यस्तरीय धनगर जमाती समूह जागृती परिषद

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सत्यशोधक समाज स्थापनेच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त मौर्य क्रांती महासंघाच्या वतीने पुणे जिल्ह्यातील जेजुरी येथे १ ले राज्य अधिवेशन आणि ४ थी राज्यस्तरीय धनगर जमाती समूह जागृती परिषदचे मंगळवार दि. ८ नोव्हेंबर रोजी आयोजन करण्यात आले आहे. ही एकदिवशीय परिषद जेजुरीतील जय मल्हार सांस्कृतिक भवन येथे ही परिषद होणार आहे. यात सत्यशोधक विचारांच्या अनुयायांचा सन्मान सोहळा, पुस्तक प्रकाशन, राज्यस्तरीय ऑनलाईन काव्यवाचन स्पर्धेचे बक्षीस वितरण, मान्यवर विचारवंतांचे मार्गदर्शन यासह विविध कार्यक्रम होणार आहेत. परिषदेचे उदघाटन इंजि. शिवाजी शेंडगे यांच्या हस्ते होईल. अध्यक्षस्थानी मौर्य क्रांती महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बलभीम माथेले असतील. विशेष अतिथी म्हणून पाल सेवा संघाचे राष्ट्रीय संघटक रामलखन पाल, बामसेफचे राष्ट्रीय अध्यक्ष कमलाकांत काळे, उद्योजक तथा ओबीसी राज्य संघटक मुबारक नदाफ, बारा बलुतेदार महासंघाचे अध्यक्ष कल्याणराव दळे, ओबीसी संघटक तुकाराम माळी, मुंबई मनपाचे पूर्वाउपायुक्त लक्ष्मण व्हटकर, धनगर अधिकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अनिलकुमार ढोले, धनगर कर्मचारी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अंकुश निर्मळ, ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण काकडे, मार्तंड देव संस्थान, जेजुरीचे विश्वस्त संदीप जगताप, यशवंत सेनेचे अध्यक्ष माधव गडदे, डॉ. प्रेमसागर), शेगर धनगर महासंघाचे अध्यक्ष सुनील भगत, धनगर एकीकरण समिती, मुंबईचे अध्यक्ष निलेश मोटे, महाराष्ट्र क्रांती संघटनेचे अध्यक्ष पी. बी. कोकरे, भारतीय पत्रकार संघाचे पुणे जिल्हाध्यक्ष रमेश लेंडे, संत कनकदास समिती, कर्नाटकचे महादेव गोकार, संपत कोळेकर, जेजुरी, अहिल्यादेवी होळकर प्रबोधन मंचचे सचिव पांडुरंग धायगुडे, युवा मल्हार सेनेच्या अध्यक्ष धनश्रीताई आजगे, औरंगाबाद खंडपीठातील विधिज्ञ ॲड. ज्योतिबा पिसाळ, सामाजिक कार्यकर्ते यशवंत पडळकर, पिसुरटीचे सरपंच अशोक बरकडे, उद्योजक आनंद होनमाने, दिनेश देवडकर, इंजि. दिनकर सोनवलकर ऑल इंडिया धनगर समाज महासंघ, मुंबईचे सुभाष येळे, सामाजिक कार्यकर्ते मोहन महाराज खोमने, मल्हार आर्मी पुणे जिल्हाध्यक्ष राहुल मदने आदी मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता परिषदेचे उदघाटन होईल. सर्व जातींची जातनिहाय जनगणना का? व कशासाठी? अथवा संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व दिल्यानेच सर्व जातींची प्रगती होणे शक्य आहे या विषयावर खुली चर्चा होईल. लेखक, वक्ते, प्रबोधनकार गोविंदराम शूरनर यांना सत्यशोधक मारोतराव पिसाळ मामा यांच्या स्मरणार्थ सत्यशोधक प्रबोधनकार पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात येईल. संचित धन्वे लिखित महानायक - खंडोबा व गोविंदराम शूरनर लिखित बहुजनांचे प्रबोधन या पुस्तकांचे प्रकाशन यावेळी केले जाईल. सत्यशोधकीय विधीकर्ते सन्मान सोहळ्याचे संयोजन डॉ. दत्तात्रय जगताप तर राज्यस्तरीय ऑनलाईन काव्यवाचन स्पर्धेच्या विजेत्या सन्मान सोहळ्याचे संयोजन विद्रोही कवी तथा मौर्य क्रांती महासंघाचे प्रदेशाध्यक्ष राजीव हाके सर करतील. त्यानंतर 'एकट्याने नाही तर एकीने लढूया' या सिद्धांतावर काम न करणे हेच आपल्या सर्व समस्यांचे मूळ कारण आहे या विषयावर चर्चा होईल. वाळवा जि. सांगली येथील शाहीर सागर माने आणि ग्रुप संुबरान - चांगभलं सादर करतील. कोल्हापूर येथील सिनियर रिपोर्टर अमोल पांढरे हे सोशल मीडियाबाबत मार्गदर्शन करतील. या परिषदेला धनगर जाती-जमातीतील विद्यार्थी, युवा, महिला, बुद्धिजीवी, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते, हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन परिषद यशस्वी करावी असे आवाहन सभासदांनी केले.




भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी मुंबईत भाजपा प्रदेश कार्यालयात लोकसभा प्रवास योजना बैठक झाली. यावेळी भाजपा राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे व लोकसभा प्रवास योजना अभियान संयोजक माजी मंत्री बाळा भेगडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.


आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार

• घाऊक आणि किरकोळ • किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे • घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# प्रचंड उत्साहात विद्यापीठ विकास मंचचे उमेदवारी अर्ज दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, पुरस्कृत विद्यापीठ विकास मंच डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभा पदवीधर मतदारसंघ निवडणुकीत आज पदवीधर उमेदवारीचे अर्ज दाखल करण्यात येत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अधिसभा (सिनेट) निवडणुकीच्या निमित्ताने यंदाची विद्यापीठाची अधिसभा (सिनेट) निवडणूक तथया दृष्टिकोनाने अत्यंत महत्वाची ठरणार आहे. उच्च शिक्षण क्षेत्रातील आव्हाना बरोबर नवीन शैक्षणिक धोरणांनाची अंमलबजावणी गतिमान पद्धतीने व पारदर्शकतेने करणे वाय कालावधीत होईल अशा परिस्थितीत या विद्यापीठाला योग्य दिशा देणारी व शैक्षणिक क्षेत्राची जाणीव असलेल्या प्रतिनिधीचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग अत्यंत महत्वाचा आहे अशा महत्वाच्या पार्श्वभूमीवर २०२२ च्या होणाऱ्या विद्यापीठाच्या पदवीधर मतदार संघाच्या निवडणुका विद्यापीठ विकास मंच लढवत आहे. विद्यापीठे ही राजकारणाचा अड्डा न बनता राष्ट्रकारण व समाजकारण करण्यामध्ये आग्रहपूर्वक अग्रेसर राहिली पाहिजे यासाठी दक्ष राहून योग्य निर्णय करून घेणे ही विद्यापीठ विकास मंचाची उच्च शिक्षण क्षेत्रातील सर्व संबंधिताकडून अपेक्षा आहे. त्यासाठी विदयापीठ विकास मंच आग्रहपूर्वक प्रयत्न करीत आहे. शिक्षण क्षेत्रात योग्य दिशा देणारी ही भूमिका प्रत्यक्ष व्यवहारात आणण्यासाठी निर्णय प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभागी होऊन त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी विद्यापीठ विकास मंचाची आहे. परिवर्तनाच्या या प्रक्रियेत कर्तव्य भावनेने प्रयन्त करत राहण्याची मानसिकता विद्यापीठ विकास मंचाच्या सर्व सदस्यांची आहे. उच्च शिक्षणातून होणारे प्रयत्न व नवनविन प्रयोग हे या देशातील पिढी घडवणारे एक साधन आहे.प्रत्येक उच्च शिक्षित विदयार्थ्याला आपली बुद्धी आणि कर्तुत्व भारत मातेच्या सेवेत समर्पित करण्यासाठी संस्कार देणारे गुरुकुल म्हणजे विदयापीठ होय. अशा व्यापक विचाराने विद्या क्षेत्रात कार्य करावे हा विद्यापीठ विकास मंचाचा प्रयत्न. तसेच महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या अधिकार मंडळा मध्ये विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून निश्चित भूमिका बजावणाऱ्या आणि उच्चशिक्षण क्षेत्रात राष्ट्रहिताच्या भावनेतून काम करणाऱ्या कार्यकत्यांचा मंच म्हणजेच विदयापीठ विकास मंच होय. गतवर्षी विदयापीठ अधिसभा (सिनेट)



निवडणुकीत विद्यापीठ विकास मंचाचे अधिक सदस्य निवडून यावे यासाठी आपण केलेले प्रयत्न व मतदान याचे फलित म्हणून अनेक प्राधिकरण / समित्यानंवर निवडून गेल्यावर काम करत असताना विदयापीठाचा विकास व पर्यायाने उच्च शिक्षणाचा विकास हेच ध्येय डोळ्या समोर ठेवून कामकाजात गतीमानता व पारदर्शता आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले गेले. यापुढे ही विद्यार्थ्यना गृहित न धरता निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेऊन निर्णय करणे, उम्र शिक्षणातील विद्यार्थी, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, संस्थाचालक इ. सर्व घटक मिळून प्रयत्न करणे आणि यातून उच्चशिक्षणा समोरील आव्हाने सहज पेलता येण्याजोगी परिस्थिती निर्माण करणे या भूमिकेतून निवडून येणारे प्रत्येक सदस्य प्राधिकरणामधील आपापली जबाबदारी कर्तव्यपूर्वक पार पाडतील यासाठी विदयापीठ विकास मंच कटिबद्ध आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अधिसभा पदवीधर मतदारसंघ निवडणुकीत विद्यापीठ विकास मंचाचे खालील प्रमाणे उमेदवार असतील.खुल्या प्रवर्गातील उमेदवार

१)डॉ.योगिता तौर (खुला प्रवर्ग)
२)ॲड. सुनिल जाधव (खुला प्रवर्ग )
३)ॲड.आशिष नावंदर (खुला प्रवर्ग)
४)श्री.अमर परमेश्वर कदम (खुला प्रवर्ग)

राखीव प्रवर्गातील उमेदवार

५)श्री.चंद्रकांत फड (NT प्रवर्ग)
६) गजानन डुकरे ( ST) प्रवर्ग
७)श्री.संतोष थोरात (OBC प्रवर्ग)
८). संजय गायकवाड (SC प्रवर्ग)
९)सौ.ज्योती आसाराम तुपे (महिला प्रवर्ग)
१०) मोहमद आझरुदिन (ST)

या वेळी फॉर्म भरताना विद्यापीठ विकास मंचाचे नेते प्रा.डॉ. गजानन सानप, किशोर शितोळे, भाजप प्रदेश सचिव प्रविण घुगे, प्रा.डॉ. गोविंद काळे,प्रा. डॉ. कालिदास भांगे, प्रा.डॉ.देवराज दराडे, प्रा. डॉ. भगवानसिंग डोबाळ, प्रा.डॉ.सुरेश मुंडे, प्राचार्य डॉ. मजहर फारुकी, प्रा.डॉ. सर्जेराव जिगे, प्रा. डॉ.व्यंकटेश लांब, प्रा.डॉ.शिवाजी हुसे, मराठवाडा शिक्षक मतदार संघाचे भाजप उमेदवार किरण पाटील, प्रा. डॉ. सचिन कंदले, प्राचार्य सुहास मोराळे, सुरेश पठाडे, डॉ.राम बुधवंत, पंकज भारसाकळे, प्रा.डॉ. सोमीनाथ खाडे, प्रा.डॉ.अश्विन राजनीकर, डॉ. भाऊसाहेब सोनटक्के, प्रा.डॉ. टि आर पाटील, निखिल आठवले, महेंद्र मुंडे , ऋषिकेश केकान, राहुल लाखे,प्रवीण शिरसाट, अभिषेक गावडे, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



# चोरीच्या रिक्षा बाळगणाऱ्याच्या गुन्हे शाखेने आवळल्या मुस्क्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** देवपूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत संशयित चोराची विचारपूच करत असता त्याच्या जवळील रिक्षा ही चोरीची असल्याची लक्षात येताच स्थानिक गुन्हे शाखा यांनी त्या संदर्भात पुढील तपास करता त्याच्याजवळ सात रिक्षा आढळून आल्यात. स्थानिक गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना धुळे शहरात देवपुर पोलीस स्टेशन हदीत अशी माहिती प्राप्त झाली की अब्दुल रहीम मजीद शेख , रा. गौसीया मस्जीद जवक बिटमा , देवपुर हा याच्या ताब्यात चोरीची रिक्षा बाळगुन असल्याबाबत माहिती प्राप्त झाल्याने सदर इसमाचा शोध घेता तो वीट भट्टी परिसरात मिळून आता त्याला शिक्षाबाबत विचारणा करता त्याने रिक्षाची कागदपत्रे नसल्याचे सांगुन सदर रिक्षा कल्याण येथीत सुभाष नावाच्या व्यक्तीकडून खरेदी केल्याचे सांगीतले आहे . तसेच त्याने दिलेल्या माहितीवरून चोरीच्या व बनावट क्रमांकाच्या एकूण सात रिक्षा जप्त करण्यात आल्या आहेत . एकुन ४ लाख ५० हजार रुपये अशी किंमत आहे. ७ रिक्षा पैकी ३ रिक्षा ह्या चोरीच्या असल्याच्या निष्पन्न झाले आहेत. स्थानिक गुन्हे शाखा यांच्या जवळील जप्त करण्यात आलेल्या रिक्षा पुढील तपास कामी देवपुर पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आल्या आहेत. सदरची कारवाई मा पोलीस अधीक्षक श्री संजय बारकुड साहेब, अपर पोलीस अधीक्षक श्री प्रशात बच्छाव साहेब यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्था.गु. शा चे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोउनी योगेश राऊत पोह स्फीक पठाण, प्रभाकर वैसाणे, श्रीकांत पाटील , पोना योगेश चव्हाण , राहुल सानप, पोलि कमलेश सुर्यवंशी तुधार पारची मयुर पाटील अज्ञांनी केली आहे.

# तहसीलदारांवर वाळू तस्करांचा जीवघेणा हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** मोहाडीचे तहसीलदार दीपक कारंडे यांच्यावर बुधवारी वाळू तस्करांनी जीवघेणा हल्ला केला. जिल्ह्यातील एका बड्या नेत्याच्या खासगी संघटनेच्या कार्यकर्त्याचे नाव या हल्लाप्रकरणी समोर येऊ लागले आहे. राज्याचे गृहमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री वाळू तस्करांविरोधात कठोर पावले केव्हा उचलणार, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. एका बड्या नेत्याच्या आशीर्वादाने तर हा सर्व वाळू तस्करीचा प्रकार तर सुरू नाही ना, अशी चर्चा जोर धरू लागली आहे. वाळू तस्करांवर कारवाई करण्यासाठी गेलेले मोहाडीचे तहसीलदार दीपक कारंडे यांच्यावर वाळू तस्करांनी काल जीवघेणा हल्ला केला होता. स्वतःचा जीव वाचविण्यासाठी तहसीलदारांनी त्यांच्याकडे असलेल्या बंदुकीने हवेत गोळीबार केला. वाळू तस्करांद्वारे जेसीबीच्या पंजाने तहसीलदार दीपक कारंडे यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. हल्ल्यानंतर तहसीलदार कारंडे यांनी मोहाडी पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यानंतर लगेच जेसीबी व टिप्पर चालक, मालक यांच्याविरुद्ध मोहाडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून जेसीबी चालकाला अटक केली आहे.

# परतीचे दोर कापले नाहीत : सुषमा अंधारे

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** आम्ही बंडखोरांच्या परतीचे दोर कापले नसल्याचे सांगत शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी मोठा दावा केला आहे. शिंदे गटात काही आमदार नाराज असून काहीजण संपर्कात असल्याचे त्यांनी म्हटले आहे. शिंदे गटात असलेले आमदार संजय शिरसाट आमच्या संपर्कात असल्याचा दावा त्यांनी केला आहे. सुषमा अंधारे या सध्या 'महाप्रबोधन यात्रे'निमित्त जळगावात आहेत. त्यानिमित्ताने त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. सुषमा अंधारे यांनी म्हटले की, शिवसेना नेते आदित्य ठाकरे आणि आम्ही संयमित भाषेचा वापर करत आहोत. आम्ही टीका करताना कधीही पातळी सोडणार नसल्याचे म्हटले. बंडखोरांना माघारी परता येईल असे संकेत देताना त्यांनी परतीचे दोर आमच्याकडून कापले गेले नसल्याचे म्हटले. आमदार संजय शिरसाट हे शिंदे गटात अस्वस्थ असून त्यांना पश्चाताप होत आहे. ते आमच्या संपर्कात असल्याचे सुषमा अंधारे यांनी म्हटले.

भाजपवर टीका करताना अंधारे यांनी सांगितले की, ईडी, सीबीआयचा भाजपकडून दुरुपयोग सुरू आहे. भाजपमध्ये असलेल्या कोणत्याही भ्रष्टाचारी नेत्याविरोधात कारवाई केली जात नसल्याचे त्यांनी म्हटले. कोरोना काळात जिल्ह्यात झालेल्या अपहाराबाबत कोणतीही कारवाई केली जात नाही. किरीट सोमय्या यांची ईडीशी जवळीक आहे. त्यांनी पाचोरा येथील जमीन आरक्षणाच्या प्रश्नात लक्ष घालावे अशी मागणी केली. महापौर शिवसेनेच्या आहेत म्हणून महापालिकेचा निधी पालकमंत्री रोखत आहेत ,त्यांना त्रास दिला जात आहे हे योग्य आहे का असा सवालही त्यांनी केला. मागील काही दिवसात कुरघोडीचे राजकारण सुरू असून लोकांच्या प्रश्नांवर चर्चा होत नाही. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर घोषणा झाल्या आहेत. मात्र, या घोषणा हवेतच असल्याचे त्यांनी सांगितले. सुषमा अंधारे यांनी हिंदुत्वावर भूमिका स्पष्ट करताना म्हटले की मला सर्व धर्मांबाबत आदर आहे. स्वामी विवेकानंद यांनी शिकागोमधील परिषदेत हिंदुत्व सांगितले ते महत्त्वाचे असल्याचे त्यांनी म्हटले.


# तरुण कवी पुरंजय खन्ना यांचे पहिले पुस्तक "सेकंड स्टार" एस्टोनियाच्या राजदूत कॅटरिन किवी यांच्या हस्ते भारतात लाँच

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** तरुण कवी पुरंजय खन्ना यांच्या 'सेकंड स्टार' या पहिल्या पुस्तकाचे प्रकाशन मुंबईतील ताजलँड एंड हॉटेलमध्ये मोठ्या थाटात करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या होत्या रिपब्लिक ऑफ एस्टोनियाच्या भारतातील राजदूत कॅटरिन किवी. पुस्तक प्रकाशनाचे प्रमुख पाहुणे श्री सुमित मलिक, मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र होते, तर अतिथी कलाकार होते अभिनेता डेन्झिल स्मिथ आणि कॅप्टन ऑलविन सलधना. डेन्झिल स्मिथने आपल्या प्रभावी आवाजात या पुस्तकातील काही कविता सुंदरपणे वाचल्या. यासोबतच स्वतः पुरंजय खन्ना यांनीही आपल्या खास शैलीत आपल्या रचलेल्या कवितांचे पठण केले.

यावेळी भव्य केक कापून पुरंजय खन्ना यांचा वाढदिवसही साजरा करण्यात आला. पुरंजयचे वडील सुनील खन्ना आणि आई अलका खन्ना हे देखील येथे उपस्थित होते.

कतरिना किवी म्हणाली की, आज रात्री मी इथे आहे ही माझ्यासाठी खूप आनंदाची आणि सन्मानाची बाब आहे. पुस्तकात समाविष्ट केलेल्या कविता अतिशय वैश्विक आहेत. पुरंजय खन्ना यांनी एवढे चांगले पुस्तक प्रकाशित केले याचा मला आनंद आहे. मी त्यांचे अभिनंदन करतो.




पुरंजय खन्ना यांनी सांगितले की, मी दहावीत असल्यापासून कविता लिहित आहे. मला पहिल्यापासून साहित्य आणि कवितेची प्रचंड आवड आहे. माझ्या आईने मला लहानपणापासून खूप काही शिकवले. मी खूप कादंबऱ्या आणि पुस्तके वाचली. कोरोनाच्या काळात गेल्या दोन वर्षांत मी १०० कविता लिहिल्या आहेत आणि आता माझे पहिले पुस्तक तुमच्यासमोर आहे. मला हिंदीतही खूप रस आहे, मला चांगल्या संवादांमध्ये खूप रस आहे. मी या पुस्तकाचा हिंदीत अनुवाद करून लवकरच आणू अशी आशा आहे.

पुरंजय खन्ना पुढे म्हणाले की, पाऊस, मैत्री, नैराश्य, चांगले-वाईट मला कविता लिहिण्याची प्रेरणा देतात. स्वप्ने पाहून मला काही कवितांची प्रेरणा मिळाली. माझी प्रत्येक कविता एकमेकांपेक्षा खूप वेगळी आहे. जिवंत असणे म्हणजे काय? माझ्या कविता हा प्रश्न उपस्थित करतात. चांगले आहे, वाईट आहे, प्रेम आहे, फसवणूक आहे, शेवटी जीवन काय आहे. जीवन म्हणजे काय हे आपल्या सर्वांनाच समजत नाही. कृष्णविवरातही आपल्याला कळत नाही की आत काय आहे. या विषयावरची एक कविता पुस्तकात समाविष्ट केली आहे. मी या कवितांमध्ये जीवनाचे तत्त्वज्ञानही सांगितले आहे. मी लिहिले आहे की लोक सुखाच्या मागे धावतात. आपल्याला शांती आणि समाधानाची गरज आहे या वस्तुस्थितीमुळेच खरा आनंद मिळतो. माझ्या जीवनाचे तत्वज्ञान हे आहे की शांततेने जगणे, इतरांना दुखवू नका, पुढे जा."

पुरंजय खन्ना यांचे वडील सुनील खन्ना म्हणाले की, कोविड काळात पुरंजयने आपल्या सर्व भावना कवितांच्या रूपात मांडल्या. मला माझ्या मुलाचा खूप अभिमान आहे आणि भारतातील रिपब्लिक ऑफ एस्टोनियाच्या राजदूत कॅटरिन किवी यांचा तिच्या हस्ते या पुस्तकाचे लोकार्पण केल्याबद्दल मी अत्यंत आभारी आहे.

पुरंजय खन्ना यांची आई अलका खन्ना यांनीही यावेळी आपला आनंद व्यक्त केला आणि सांगितले की, आज मी खूप आनंदी आहे, मी या संध्याकाळच्या प्रत्येक क्षणाचा आनंद घेत आहे. माझ्याकडे सांगायला शब्द नाहीत. मी पुरंजयला कसे लिहायचे ते शिकवले आणि त्याने सेकंड स्टार हे पुस्तक तयार केले. मी येथे उपस्थित असलेल्या सर्व पाहुण्यांचे आभार मानतो.

# ‘विकासाचा कल्पवृक्ष’ ऑडियो बुकची संकल्पना महत्वपूर्ण : मुख्यमंत्री

## मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या कार्याविषयीच्या पुस्तकाच्या स्टोरी टेल आवृत्तीचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** ‘स्टोरी टेलचे ‘विकासाचा कल्पवृक्ष’ हे ऑडियो बुक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यातील संवेदनशील माणूस लोकांपर्यंत पोहचवेल. त्यादृष्टीने ही ऑडियो बुकची संकल्पना निश्चितच महत्वाची आणि उपयुक्त असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे सांगितले. 'विकासाचा कल्पवृक्ष' या पुस्तकाच्या स्टोरीटेलने तयार केलेल्या ऑडियो बुक आवृत्तीचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते प्रकाशन झाले. याप्रसंगी वने तथा सांस्कृतिक कार्ये, मत्सव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार, स्टोरी टेलचे भारतातील प्रमुख योगेश दशरथ, मराठी विभागाचे प्रमुख प्रसाद मिरासदार आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, ज्यांच्याकडे कर्तृत्व असते, त्यांच्याच कार्याबाबत पुस्तक प्रकाशित होत असतात. मंत्री म्हणून सुधीर मुनगंटीवार यांचे कार्य कर्तृत्व पहात आलो आहे. त्यांनी अनेक जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्या आहेत. त्यांची अर्थमंत्री म्हणून काम करण्याची पद्धतीही जवळून अनुभवली आहे. वनमंत्री म्हणूनही त्यांनी मोठे काम केले आहे. कोट्यवधी वृक्ष लागवडीचे शिवधनुष्यही पेलले आहे. आता तर त्यांच्याकडे सांस्कृतिक कार्ये मंत्रीपदही आहे. म्हणजे त्यांच्याकडे आता वन आणि मन याविषयी काम करण्याची जबाबदारी आहे. त्यांची विधिमंडळ सभागृहातील भाषणे, विषय मांडण्याची हातोटी सर्वांनाच माहित आहे. ते मांडणी करताना अनेक दाखले, आकडेवारीची पोतडीच घेऊन येतात. मंत्रिमंडळ बैठकीतही ते परखडपणे बोलतात. राज्याच्या, लोकांच्या हिताच्या योजना, चांगले निर्णय लोकांपर्यंत पोहचले पाहिजेत, यासाठी त्यांची तळमळ असते. या ऑडियो बुकच्या माध्यमातून त्यांची ही तळमळ, त्यांच्यातील संवेदनशील माणूस लोकांपर्यंत पोहचेल, असा विश्वास आहे. मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, महाराष्ट्राकडे सांस्कृतिक समृद्धी आहे. ती अशा ऑडियो बुकच्या माध्यमातून जगभर पोहचविता येईल. ऑडियो बुकचे हे माध्यम शक्तीशाली आहे. यासाठी हा उपक्रम राबविला जात आहे. आपला महाराष्ट्र धनसंपन्न होईलच. पण तो गुणसंपन्नही होईल. यासाठी या ऑडियो बुक संकल्पनेचा वापर करता येईल. मंत्री श्री. मुनगंटीवार यांच्या कार्याविषयीचे ‘विकासाचा कल्पवृक्ष’ हे पुस्तक किरण कुलकर्णी यांनी लिहीले आहे. त्याच्या ऑडियो बुकसाठी कुणाल आळवे यांनी आवाज दिला आहे.

# जिल्हा रुग्णालयाच्या अनागोंदीविरोधात स्वाभिमानी पँथर सेनेची निदर्शने



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्हा सर्वोपचार रुग्णालयात अनेक विभागांची कार्यप्रणाली बिघडलेली आहे. सर्वत्र अनागोंदी कारभार सुरु आहे.याविरोधात स्वाभिमानी पँथर सेनेने ॲड. संतोष जाधव यांच्या नेतृत्वाखाली रुग्णालयासमोर जोरदार निदर्शने करीत रुग्णालय प्रशासनाला निवेदन दिले. जिल्हा रुग्णालयातील अनेक विभागांमध्ये अस्वच्छता असते. त्यामुळे रुग्णांसह नातेवाईकांच्या आरोग्याला धोका आहे. डॉक्टर्स वेळेवर उपलब्ध नसतात. रुग्णांना योग्य सुविधा मिळत नाहीत. वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांचा अभाव आहे. त्यामुळे रुग्णांच्या नातलगांनाच रुग्णाचे कपडे, डायपर बदलणे, युरीन बॅग खाली करणे, रुग्णांना ने-आण कारणेइत्यादी कामे करावी लागतात. या अनागोंदी कारभाराविरोधात जोरदार घोषणाबाजी करीत स्वाभिमानी पँथर सेनेतर्फे रुग्णालयासमोर निदर्शने करून प्रशासनाला निवेदन देण्यात आले. वर्ग ४ ची कर्मचारी भरती करा, बाह्य रुग्ण विभागात डॉक्टर्स, लेक्चर, एचओडी यांना उपस्थित राहून रुग्णांना सेवा देण्याचे आदेश द्या. वयोवृद्धांना केसपेपर काढण्यासाठी स्वतंत्र एक खिडकी योजना सुरु करा. सिटीस्कॅन मशीन सुरु करा. बंद अवस्थेतील लिफ्ट सुरु करा. स्ट्रेचर्सची संख्या वाढवा, शौचालये व बाथरूम्सच्या स्वच्छतेसाठी सफाई कर्मचारीही नियुक्त करा, शासनातर्फे रुग्णांसाठी औषधे आणि साधनसामग्री उपलब्ध करा, अतिआवश्यक लागणारे बाहेरील औषधे पिवळे रेशनकार्डधारकांना २४ तासांच्या आत उपलब्ध करून द्या, स्वतंत्र ॲम्बुलन्सची व्यवस्था करा, तात्काळ ओपीडी स्तरावर सोनोग्राफी सुरु करा, टु डी इको सेंटर वेळापत्रकाची माहिती डॉक्टरांच्या नावासह बोर्डवर लावा, रुग्णाच्या नातलगांची राहण्याची व जेवणाचीही सोय करा, खेळाडूंना वैद्यकीय प्रमाणपत्र विनामूल्य द्या, प्रसूती कक्षात खाटांची संख्या वाढवा, धार्मिक यात्रेसाठी जाणाऱ्यांची वैद्यकीय सातपासणी मोफत करा अशा मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत. निवेदनावर ॲड. संतोष जाधव, ॲड. बापू थोरात, उमेश कढरे, नितीन वाघ, कैलास अमृतसागर, करण जाधव, जितू पवार, दिनेश चांदणे, ॲड. रोहित गायकवाड, पवन अहिरे, प्रकाश बोरसे, हिरामण मालचे, पवन अहिरे उर्फ कांचाभाई, नारायण महाले, राहुल वाघ यांच्या सह्या आहेत.

# भीमगर्जना सामाजिक संघटनेच्या औरंगाबाद जिल्ह्यातील विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जिल्हा संघर्ष दौरा सुरू असताना येथील सुभेदारी शासकीय विश्रामगृह विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आले महाराष्ट्र सरचिटणीसपदी अशोक गरुड, औरंगाबाद शहर सहसचिवपदी नदीम खान, औरंगाबाद महिला आघाडी जिल्हाध्यक्षपदी हर्षाका ताई रत्नपारखे,औरंगाबाद महिला आघाडी जिल्हा कार्याध्यक्ष पदी संगीता ताई गायकवाड, औरंगाबाद जिल्हा महिला आघाडी सरचिटणीस पदी करुणा पायकडे, तर औरंगाबाद महिला आघाडी शहराध्यक्षपदी मंजिरी शेजवळ यांची निवड संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष फिरोज भाई पठाण महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष के. ए. काजी महिला प्रदेश अध्यक्ष रेशमा पठाण महाराष्ट्र राज्य सचिव इलियाज शेख औरंगाबाद जिल्हा कायदेविषयक सल्लागार एडवोकेट फारुक पठाण औरंगाबाद जिल्हा प्रभारी राजूभाई शेख श्रीरामपूर तालुकाध्यक्ष प्रतीक्षा श्रीरामपूर तालुका उपाध्यक्ष सोनू शेख आधी कार्यकर्ते पट अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये नियुक्तीपत्र घेऊन सर्वांच्या निवडी करण्यात आल्या तर त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे संपूर्ण महाराष्ट्रातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.





# तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत रब्बी ज्वारी बियाणे थेट बांधावर वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील ममुराबाद मध्ये राष्ट्रीय अन्नसुरक्षा पौष्टिक तू तृपधान्य प्रधानमंत्री सूक्ष्म प्रक्रिया उद्योग योजना मध्ये तालुका कृषी अधिकारी शिरीष घन बहादुर यांच्या मार्गदर्शनाखाली ही योजना ममुराबाद येथे थेट शेतकऱ्यांच्या बांधावर रब्बी ज्वारीचे बियाणे वाटप करण्यात आले त्यावेळी वाटप करताना कृषी सहाय्यक संजय सुरसे यांनी परिश्रम घेतले मंडळ कृषी अधिकारी विजय नरवडे, कृषी पर्यवेक्षक अधिकारी राहुल गायकवाड, कृषी सहाय्यक संजय सुरसे यांनी परिश्रम घेतले त्यावेळी गावकरी सरपंच कृष्णा गावंडे, उपसरपंच गफार रसूल पटेल, सुखदेव अंबादास वेताळ, नाजीर शब्बीर पटेल, ज्ञानेश्वर दामू वेताळ, संतोष तुकाराम वेताळ, सोपान जनार्दन वेताळ, आप्पासाहेब तुकाराम वेताळ, शिवाजी शाहूबा जेठे, भानुदास किसन जेठे, रत्नाकर सूर्यभान जेठे, नामदेव कडूबा जेठे, कारभारी सांडू जेठे, पंडित कडूबा जेठे, एकनाथ कडुबा जेठे, जानेफळ पो. प अमीन सय्यद, ममुराबाद पाटील अजिनाथ वेताळ, सोमीनाथ आदबने, संतोष आनंदा आदबने आदीची उपस्थिती होती.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# पदवीधरांच्या समस्यांची सोडवणूक नोंदणीद्वारे शक्य

## मतदार नोंदणीसाठी पुढाकार घ्यावा; ॲडव्होकेट जुबेर शेख यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पदवीधरांच्या समस्यांची सोडवणूक पदवीधरांच्या संगठीत होण्याने व सर्व पदवीधरांची नोंदणी होऊनच होऊ शकते. त्यासाठी पदवीधारांनी नाशिक विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणीसाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन पत्रकार परिषदेतून ॲडव्होकेट जुबेर शेख यांनी केले आहे. धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या भवनात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. नाशिक विभाग पदवीधर मतदारसंघातून निवडून आलेल्या आमदारांनी मागील दशकांत जगभरात व देशभरात फोफावत असलेले स्टार्टअप , स्किल डेव्हलपमेंट, उद्योजकीकरण रूपी प्रगतीचे वादळ थोपाऊन धरल्याचे निराशाजनक चित्र नाशिक विभागात पहायला मिळत आहे. नाशिक विभागातील पदवीधर आमदारांच्या उदासीनतेमुळे अथवा अकार्यक्षमतेमुळे या भागातील पदवीधर देशोधडीला लागला असल्याचे विदारक चित्रपहावयास मिळत आहे. नाशिक विभागात पदवीधरांना नोक-या उपलब्ध नाहीत, नौकरीवर असलेले पदवीधर बेरोजगार झालेले आहेत . विविध उद्योग स्थालांतरीत झाल्याने किंवा बंद पडल्याने मोठ्या प्रमाणावर नौकर कपातीद्वारे पदवीधर बेरोजगार झालेला आहे व त्याचसोबत पदवीधरांकरीता शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी न झाल्याने व पदवीधर आमदारांनी अकार्यक्षमता दाखवल्याने नविन उद्योजक तयार झाले नाही व त्यांच्याद्वारे नविन रोजगाराच्या संधी बेरोजगारांना उपलब्ध झाल्या नाही . याचसोबत कोरोना कालावधीत सर्वात जास्त नुकसान उठवणारा व समस्यांनी ग्रस्त असलेला घटक अर्थात पदवीधरच होता . यासर्व नकारात्मक वातावरणात सकारात्मकता दाखविण्याची वेळ पदवीधरांकडे आलेली आहे. त्यामुळे पदवीधरांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. त्या समस्या सोडवण्याकरिता पदवीधरांनी नाशिक विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणी अभियानात सहभाग नोंदवावा. तरी या अभियानाची 1 ऑक्टोबर 2022 पासून सुरुवात झाली असून नोंदणीची शेवटची तारीख 7 नोव्हेंबर 2022 आहे नोंदणी करिता गुगल वर सहज उपलब्ध फॉर्म नंबर 18 भरून त्यासोबत फोटो डिग्री सर्टिफिकेट अथवा मार्कशीट,आधार कार्ड, मतदान कार्ड, स्वयम साक्षांकित व अडेस्टेड झेरॉक्स जोडून सदर फॉर्म जवळच्या तहसील कार्यालयात जमा करावा अशी माहिती आयोजित पत्रकार परिषदेतून एडवोकेट जुबेर शेख यांनी दिली आहे.

# फुकट्या प्रवाशांकडून दंडाची वसुली

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** रेल्वेकडून फुकट्या प्रवाशांवर होणारी कारवाई वाढली असून, यंदाच्या आर्थिक वर्षातील दंडाच्या वसुलीचे उद्दिष्ट सात महिन्यांच्या आतच पूर्ण करण्यात आले आहे. एप्रिल ते ऑक्टोबर या कालावधीत विनातिकीट प्रवास करणाऱ्यांकडून तब्बल १४.६८ कोटी रुपयांच्या दंडाची वसुली करण्यात आली आहे. ऑक्टोबर महिन्यातील कारवाईमध्ये २७ हजारांहून अधिक फुकट्या प्रवाशांना पकडून त्यांच्याकडून २.३० कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. विनातिकीट प्रवास करणाऱ्यांना पकडण्यासाठी पुणे रेल्वेकडून विविध गाड्यांमध्ये तसेच फलाटावर सातत्याने तिकिटांची तपासणी केली जाते. त्याचप्रमाणे काही वेळेला तिकीट तपासणीची विशेष मोहीमही राबविली जाते. लांबपल्ल्याच्या गाड्यांसह पुणे-लोणावळा उपनगरीय रेल्वे, पुणे-दौंड डेमू आदी सेवांमध्येही सातत्याने तिकीट तपासणी केली जाते. त्याचा परिणाम म्हणून गेल्या काही दिवसांमध्ये फुकटे प्रवासी पकडले जाण्याचे प्रमाण वाढले आहे. पुणे रेल्वेने यंदाच्या आर्थिक वर्षांत एप्रिल ते ऑक्टोबर या सात महिन्यांच्या कालावधीत विनातिकीट दोन लाख पाच हजारांहून अधिक प्रवाशांना पकडले असून, त्यांच्याकडून १४.६८ कोटी रुपयांच्या दंडाची वसुली करण्यात आली आहे. या कारवाईमुळे पुणे रेल्वेला देण्यात आलेले वार्षिक दंडवसुलीचे उद्दिष्ट पार झाले आहे. विशेष म्हणजे ऑक्टोबरमधील कारवाईनंतर वार्षिक उद्दिष्टापेक्षा २२ टक्क्यांनी दंडाची वसुली अधिक झाली आहे.



# डॉ. तानाजी जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त जीवनाश्यक वस्तू व किराणा वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** टायगर ग्रुप राष्ट्रीय अध्यक्ष पै.तानाजी जाधव याच्या 2 नोव्हेंबर रोजी वाढदिवसानिमित्त पै.भैय्यासाहेब बंडगर टायगर ग्रुप उपाध्यक्ष नाशिक जिल्हाअध्यक्ष प्रशांत काळे आणि मार्गदर्शक अण्णासाहेब जोसेफ मलबारी यांच्या मार्गदर्शनाखाली खान्देश गौ शाळेत चारा वाटप, धुळे बस स्टॉप येथे शिवभोजन वाटप,सावलि वृध्द आश्रम मोहाडी उपनगर येथे फराळ व बिस्किटे चिवडा वाटप, जिल्हा रुग्णलयात जेवणाचे पॅकेट वाटप, कुष्ठरोग आश्रम येते धान्य वाटप, संस्कार मतिमंद आश्रम शाळा येते बॉडी लोशन व व्यासलिनचे बॉटल देण्यात आले. अश्या प्रकारे टायगर ग्रुपचे जिल्हाध्यक्ष जॉर्ज अण्णा मलबारी व त्यांच्या सहकारी मित्रांच्या सहयोगाने जीवनाश्यक वस्तू व किराणा वाटप करण्यात आला.

# ५० हजारांची लाच घेताना मंडळ अधिकारी जाळ्यात

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** अनुकूल निकाल देण्यासाठी पाथर्डीचे मंडळ अधिकारी व एका महिलेला ५० हजारांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. पुरूषोत्तम पराडकर असे त्या मंडळ अधिकाऱ्याचे नाव असून केतकी चाटोरकर असे त्या महिलेचे नाव आहे. तक्रारदाराने पाथर्डीच्या मंडळ



कार्यालयात अर्ज सादर केला होता. या अर्जानुसार त्यांच्या बाजूने निकाल देण्यासाठी संशयित मंडळ अधिकारी पुरूषोत्तम पराडकर व खासगी महिला केतकी चाटोरकर यांनी एक लाख रुपयांची लाच मागितली. तडजोडीअंती ५० हजार रुपये ठरले. या संदर्भात तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधला होता. या तक्रारीच्या आधारे विभागाने सापळा रचला. पराडकरने लाचेची रक्कम चाटोरकरला स्विकारायला सांगितली. ही रक्कम घेत असताना संशयितांना पथकाने ताब्यात घेतले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक सुनील कडासने, अपर अधिक्षक नारायण न्याहाळदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक वैशाली पाटील यांच्या नेतृत्वाखाली पथकाने ही कारवाई केली. संशयित मंडळ अधिकारी पराडकर व खासगी महिला चाटोरकर यांच्या विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भली मोठी आयशर सावळदे पुलावरून तापी नदीत कोसळली

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिरपूर लगद सावळदे पुलावरून भरधाव जाणारा आयशर तापी नदीत कोसळल्याची घटना सकाळी दहाच्या सुमारास घडली या घटनेत चालकाचा बुडून मृत्यू झाला. तर क्लिनरला वाचविण्यात यश आले आहे चालकाचे नियंत्रण सुटल्याने ही दुर्घटना घडल्याचे सांगितले जात आहे. घटनास्थळी शिरपूर , नरडाणा पोलिसांसह प्रांताधिकारी व तहसीलदार दाखल झाले होते. मुंबई - आग्रा राष्ट्रीय महामार्गावरून पुणे येथून मध्यप्रदेशाकडे कुरकुरे घेवून जाणारा आयशर (सीजी ०७ / सीजी ८९७०) सावळदे पुलावरून भरधाव जात असताना चालकाचे नियंत्रण सुटले. त्यामुळे हे वाहन पुलावरील कठडे तोडून तापी नदीत पहले परिसरात मोठा आवाज झाल्याने रस्त्यावरील वाहनधारक , प्रवासी व ग्रामस्थांनी पुलावर एकच गर्दी केली होती त्यांनी या घटनेची माहिती तात्काळ पोलिसांना दिली . त्यानंतर शिरपूर पोलिसांसह नरडाणा पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत ग्रामस्थांच्या मदतीने तात्काळ शोधमोहीम सुरु केली . तसेच घटनास्थळी मोठी गर्दी झाल्याने काहीकाळ वाहतूकही ठप्प झाली होती . त्यामुळे पोलिसांनी तत्काळ रस्त्यावरील गर्दी नियंत्रणात आणून वाहतूक सुरळीत केली . तोपर्यंत बचावकार्यासाठी आपत्ती निवारण कक्षाचे पथकही दाखल झाले होते . नदीत पडलेल्या आयशर वाहनात चालक व क्लिनर असे दोघेजण बसलेले असल्याने त्याचा शोध घेण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु केले . क्लिनरला वाचविण्यात यश ! आयशर वाहन नदीत पुर्णपणे बुडून केवळ वाहनाचा वरचा भाग दिसत होता . त्यामुळे दोघाच्या वाचण्याची शक्यता कमी होती . परंतु घटनास्थळी काही मच्छीमार आणि पट्टीचे पोहणारे होते . त्यांना एक जण वाहत जाताना दिसून आला त्यांनी पाण्यात उड्या घेत त्याला सुखरूप बाहेर काढले . बचावलेल्या क्लिनरचे नाव दिलीप अमरसिंग ब्राह्मणे, रा . देवळा ग्राम ता. राजपूर , जि.बडवाणी (छत्तीसगड) असे आहे. त्याला गोणीच्या साहाय्याने सुखरूप बाहेर काढण्यात आले . त्याचे दैव बलवत्तर असल्याने तो सुखरूप वाचला , अशी प्रतिक्रिया यावेळी नागरिकांमधून व्यक्त होत चालक बुडाला ! क्लिनरला वाचविण्यात यश आल्याने चालक धर्मेंद्र डावर (२५) रा. सांगवीनिम ता. राजपूर , जि बडवाणी (छत्तीसगड) याचाही शोध घेतला जात होता. बराचवेळ शोध घेवूनही तो सापडलेला नव्हता. चालकाचा बुडून मृत्यू झाला असल्याचा अंदाज आहे. दरम्यान , हे आयशर वाहन राहुल रामदास साहू, रा. ओझर, ता. राजपूर जि. बडवाणी याच्या मालकीचे असल्याचे समजते, काल सायंकाळी ६ वाजता पुणे येथून इंदोरकडे कुरकुरे घेवून हे वाहन निघाले होते.अश्या वेळेस ही मोठी घटना घडली.



# इंडोफिलच्या प्रोजेक्ट खुशीने सामाजिक उन्नतीची बीजे रोवली

## बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**अकोले :** ग्रामीण भागातील गरीब परंतु हुशार विध्यार्थीनींना शिष्यवृत्ती देण्याची इंडोफिलचा प्रोजेक्ट खुशी हा उपक्रम मुलींच्या शैक्षणिक व सामाजिक उन्नतीसाठीची बीजे रोवली आहे असे मत बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे यांनी व्यक्त केले.
कळस येथे भारतातील कृषी क्षेत्रातील इंडोफिल इंडस्ट्रीज कंपनीच्या "प्रोजेक्ट खुशी" चे उदघाटन पोपेरे यांच्या हस्ते करण्यात आला त्यावेळी त्या बोलत होत्या. कंपनी चे संस्थापक कै. के.के. मोदी यांच्या पुण्यतिथी निमित्ताने अध्यक्षा डॉ. बिना मोदी यांच्या संकल्पनेतून हा प्रोजेक्ट खुशी हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यावेळी कळस गावचे सरपंच राजेंद्र गवांदे, बायफ चे विभागीय अधिकारी जतीन साठे, भाजपचे सोशल मिडिया सेलचे जिल्हा संयोजक भाऊसाहेब वाकचौरे, श्रमिक उद्योग समूहाचे अनिल नवले, उपसरपंच ज्ञानेश्वर वाकचौरे आदी उपस्थित होते.
पोपेरे बोलताना म्हणाले की, महिला जर जिवनात शिक्षणाचा आधार घेऊन आजच्या समाजात उभी राहिली तर ती क्रांती करू शकते. मला शिक्षणाचा आधार नव्हता तरी मी मातीशी नाळ जोडली आणि पद्मश्री झाले. कंपनीच्या या उपक्रमाने भारावून टाकले आपण समाजाप्रती काही तरी देण लागतो हि उदात्त भावना ठेऊन या इंडोफिल कंपनीने स्त्रीशक्ती एकप्रकारे गौरव केला आहे. असे पोपेरे यांनी व्यक्त केले. इंडोफिल कंपनीचे जनरल मॅनेजर महेश खंबाटे यांनी प्रास्ताविक करताना ग्रामीण भागातील गरीब वंचित तसेच ज्या मुलींना शिकण्याची आवड आहे परंतु आर्थिक परिस्थिती नुसार शिक्षणावर बाधा निर्माण होत असेल तर अशा मुलींच्या पाठीमागे खंबिरपणे उभे राहुन प्रोजेक्ट खुशीच्या माध्यमातून शिष्यवृत्ती योजना राबवत शिक्षणाचे काम कंपनीच्या व्यावसायिक सामाजिक बांधीलकी फंडातून केले




जात आहे. देशातील पात्र मुलींशी सहयोग साधून खुशी पसरविण्याचे आणि उंच उडण्यासाठी पंख देण्याचे ध्येय आहे. कळसचे सरपंच राजेंद्र गवांदे यांनी महाराष्ट्रातील दोन शाळाची निवड करण्यात आली त्यात कळस येथील कळसेश्वर विद्यालय व जिल्हा परिषद प्राथमिक शाळाचा समावेश आहे याचा आम्हाला गौरव आहे. असे मत यांनी व्यक्त केले. तर देशभर राबविण्यात येणाऱ्या या योजनेचा शुभारंभ इंडोफिल कंपनीने कळस सारख्या छोट्या गावातुन केला. यातून ग्रामीण भागा प्रती कंपनी दायित्व दिसून येते. प्रोजेक्ट खुशी या उपक्रमाचा कळस नक्की होईल अकोले तालुक्यात कृषी संस्कृती अगस्ती महाराज यांनी सुरू केली असून ती जोपासना करण्याचे काम इंडोफिल करीत आहे.असे मत भाऊसाहेब वाकचौरे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे आयोजन कळस गावचे आदर्श उद्योजक अशोक वाकचौरे, इंडोफिल चे कम्युनिकेशन हेड श्रीमती नम्रता वर्तक,रिजनल डिमांड मँनेजर सागर पगार, टेरेटरी मँनेजर राजेश जाधव, डिमांड एक्सिकेटीव्ह हेड किशोर लोहार शेतकरी ग्रामस्थ विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांना शालेय उपयोगाचे साहीत्य वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता दिघे, सौ नंदा बिबवे यांची भाषणे झाली. सूत्रसंचालन मच्छिंद्र साळुंके यांनी केले.

# पदवीधर निवडणूक पुढे ढकला : डॉ. सानप

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील विविध प्राधिकरणाच्या निवडणुकीतील अक्षम्य चुकाबाबत तसेच सुट्टीत जाहीर केलेली पदवीधर निवडणुक पुढे ढकलणे बाबतचे निवदेन डॉ. गजानन सानप प्रदेश सचिव विद्यापीठ विकास मंच, महाराष्ट्र यांनी आज विद्यापीठाच्या कुलसचिवांना दिले.
या निवेदनात म्हटले आहे की, सुरुवातीपासूनच विद्यापीठाच्या निवडणुका या व्यवस्थितपणे व्हाव्यात यासाठी कुलगुरू यांना भेटून विविध निवेदने, निवड प्रक्रिया निवडणुकीची कार्यपद्धती या सर्वध विषयांवर आपणा समवेत चर्चा व या संदर्भातली निवेदने देण्यात आली होती. अतिशय दुर्देवाने सांगावेसे वाटते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत सुरू असणारी निवडणूक प्रक्रिया सदोषपूर्ण असून सदरील प्रक्रियेत माननीय कुलसचिव व निवडणूक विभाग यांच्यातील विसंवादाच्या बाबींमुळे सदरील प्रक्रियेमध्ये प्रचंड चुका झालेल्या आहेत. यामुळे सदरील निवडणुकीच्या मतदार याद्या अंतिम होण्यास मोठा कालावधी लागला आहे. तरी सुद्धा झालेल्या मतदार यादीत मोठ्या प्रमाणावर चुका झालेल्या आहेत. विद्यापीठाद्वारे प्रथमतः जाहीर झालेल्या यादीमध्ये मोठ्या प्रमाणावर चुका झाल्या पदवीधर मधील अनेक नावे मतदार यादीत आलीच नाहीत, प्राध्यापकाची 300 पेक्षा अधिक नावे प्रथम मतदार यादीत गा आली, संस्थाचालकाच्या मतदार यादी मध्ये एकमेकांच्या संस्थावर एकमेकांचे प्रतिनिधी देण्यात आले अशा एक ना अनेक बाबी सदरील यादीमध्ये घोषित करण्यात आल्या. सदरील सर्व विषयांना घेऊन विद्यापीठ विकास मंचाच्या वतीने वेळोवेळी माननीय कुलगुरू महोदय व कुलसचिव महोदय यांना निवेदने देण्यात आली. तक्रार करण्यात आल्या याच कारणाने विद्यापीठाच्या माननीय कुलसचिव यांच्या ढिसाळ



कारभारामुळे त्यांना राजीनामा द्यावा लागला, तरी सुद्धा सदरील प्रक्रियेमधील गा थांबलेला नसून अजूनही प्राध्यापक, प्राचार्य, संस्थाचालक यांच्या याद्यावरील आक्षेप आज रोजी पर्यंत सुरू आहे. पदवीधर गटासाठी विद्यापीठाने सुट्टीच्या दिवशी अधिसूचना जारी केली ऐन भाऊबीजेच्या व पाडव्याच्या दिवशी जाहीर झालेल्या अधिसूचनेमुळे अद्याप पर्यंत अनेक जणांना सदरील निवडणूक ही कळालेली नाही, सदरील अधिसूचना ही विद्यापीठाच्या वेबसाईटवर टाकण्यात आली. सदरील बाबतीत कोणतीही सूचना ही वृत्तपत्रामध्ये अथवा इतर प्रसार माध्यमामध्ये देण्यात आली नाही ही अतिशय गांभीरियाची बाब आहे. त्याच कारणाने आज दिनांक ०१/११/२०२२ पर्यंत पदवीधर गटातून निवडणूक लढवण्यासाठी फक्त ३ अर्जाची विक्री झाली आहे य दिनांक ०४/११/२०२२ रोजी हि मुद्दत संपत आहे. पदवीधर निवडणुकीच्या जाहीर झालेल्या यादीमध्ये सदरील यादी ही बूथनिहाय यादी नसून अतिशय चुकीच्या पद्धतीने सदरील यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यादी मधील पहिले नाव बीड जिल्ह्यातील तर दुसरे नाव औरंगाबाद जिल्ह्यातील आहे, यामुळे अद्यापही आपली नावे मतदार यादीत आहेत अथवा नाही याबद्दल मतदारांमध्ये मोठा संभ्रम विद्यापीठाद्वारे करण्यात आला आहे. सदरील प्रसिद्ध झालेल्या यादीत अनेक आक्षेप नोंदवूनही सदरील आक्षेपा बाबत कोणत्याही सुधारणा विद्यापीठाने केलेल्या नाहीत, विद्यापीठाच्या यादीत असणारे आडनाव चुकलेले असताना त्याबद्दल आक्षेप नोंदवलेला असताना, कोणतीही सुधारणा न करता सध्याची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. अशा शेकडो चुका सदरील यादीमध्ये विद्यापीठाद्वारे करण्यात आल्या आहेत. विद्यापीठाद्वारे प्रकाशित करण्यात आलेल्या अंतिम यादीमध्ये मतदारांचे पूर्ण नाव स्पष्ट दिसत नाही. तसेच बुथवाईज यादी नसल्या कारणाने मतदानाची कोणतीही स्पष्टता या द्वारे होत नाही.
सदरील घटलेल्या सर्व घटनांची नोंद घेता सदरील निवडणुकीत पदवीधरांना योग्य प्रतिनिधित्व मिळण्यासाठी योग्य कालावधी उपलब्ध करून देण्यात यावा. सदरील निवडणूक किमान पंधरा दिवस पुढे ढकलावी, दोषींवर कार्यवाही करावी व सदरील सर्व अधिसूचना या वृत्तपत्राच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवाव्यात. अशी विद्यापीठ विकास मंच मागणी करीत आहे.

# ग्रामीण भागात योजनांची अंमलबजावणी करावी

## जिल्हाधिकारी आस्तिककुमार पाण्डेय

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** ग्रामीण भागातील निराधार, शेतकरी, महिला आणि बेघरांसाठी शासन विविध कल्याणकारी योजना राबविले. या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अस्तिककुमार पाण्डेय यांनी पैठण दौऱ्या दरम्यान दिले. पैठण तहसील कार्यालय आणि पंचायत समिती कार्यालयातील सर्व विभागाच्या कक्षात भेट देऊन योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा जिल्हाधिकारी पाण्डेय आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विकास मीना यांनी घेतला. पैठणचे उपविभागीय अधिकारी स्वप्निल मोरे, तहसीलदार शंकर लाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.देसले, गटविकास अधिकारी डॉ.ओमप्रकाश रामावत यांच्यासह तहसील आणि पंचायत समिती कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती. पैठण तहसील कार्यालयाच्या भेटीदरम्यान जिल्हाधिकारी यांनी संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ निराधार योजनेसह "थोडेसे मायबापासाठी" या उपक्रमाला गती देण्यास सांगितले. निराधार, गरजू, वृद्ध ,विधवा आणि अपंगांना शासनाच्या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी तालुक्यातील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांची मदत घेऊन ग्रामीण भागात सर्वेक्षण करावे, सर्वेक्षणातून अधिकाधिक लाभार्थ्यांची निवड करता येईल, यामुळे गरजूंना आर्थिक लाभ मिळेल. तालुक्यातील शिधापत्रिका आधार संलग्निकीकरण करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याबरोबरच पुरवठा विभागाने तालुक्याचा लक्षांकाचे उद्दिष्ट पूर्ण करावे. पैठण तालुक्यातील अवकाळी पावसाने झालेला पिकांच्या नुकसानीचे पंचनामे पूर्ण करून शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया करण्याबाबतही त्यांनी सूचित केले.



# जनसेवा हीच ईश्वरसेवा सेवा मानून जनसेवा : चंद्रकांत दादा

आधुनिक केसरी न्यूज

**अकोले :** श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या माध्यमातून गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली 80 टक्के समाजकार्य व 20 टक्के अध्यात्मिक कार्य चालते व तीच खरी आपली ओळख आहे. जनसेवा हिच ईश्वर सेवा मानून जन सेवा अभियान- एक हात मदतीचा हा उपक्रम सर्व केंद्रात राबविला जातो असे प्रतिपादन श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्रंबकेश्वरचे गुरुपुत्र चंद्रकांत दादा मोरे यांनी केले. अकोले येथील विठ्ठल लॉन्स येथे तालुक्यातील सर्व केंद्राच्या माध्यमातून आयोजित केलेल्या सत्संग मेळाव्यात उपस्थित भाविक, नागरिकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

गुरुपुत्र चंद्रकांत दादा पूढे म्हणाले की, ज्यावेळी दुखीत माणूस भगवंताचा शोध घेतो. त्यावेळी त्यास भगवान वेगवेगळ्या रुपात, स्वरूपात, विविध प्रकारे विश्वात स्थानापन्न झालेला दिसून येत असतो .तो चराचरात भरलेला आहे.माणूस हा ईश्वर व गुरूचा अंश आहे.त्यामुळे स्वामी मार्गातून अनेक दुःखीतांचे दुःख दूर केले जाते.80 टक्के समाजकार्य व 20 टक्के आध्यत्मिक कार्य



करण्याचे गुरुमाऊली नी सांगितले आहे. या सेवा मार्गातून गुरुपीठ त्र्यंबकेश्वर येथून अनेक निराधार बालकांना कपडे,जेवण,शालेय साहित्य दिले जाते. तर अनेक निराधार लेकी भगिनींना साडी चोळी, भांडी भेट दिली जाते. सर्वांना मोफत औषधोपचार केले जातात. व हे सर्व समाजाचे ऋण सर्वांच्या दानातून केले जाते.म्हणूनच दान हे सर्वश्रेष्ठ आहे असे त्यांनी मत व्यक्त केले. मोरे पुढे म्हणाले की, अकोले तालुका हा आदिवासी तालुका आहे. आदिवासी म्हटले की,काहींच्या मनात नकारात्मक सूर येतो.मात्र आदिवासी संस्कृती ही खऱ्या अर्थाने इतर समाजाला दिशा देणारी संस्कृती आहे.त्याचे कारण म्हणजे आदिवासी समजामध्ये मुलीचा जन्म झाला की,तिची पूजा केली जाते.मुलाला हुंडा दिला जात नाही तर उलट मुलीला हुंडा देण्याची प्रथा आहे.या समाजात कधीही मुलींवर अत्याचार, अन्याय होत नाही.अशा अत्याचाराची बातमी कधीही वाचण्यात आली नाही.असे मात्र इतर समाजातील उच्चभ्रू, सुशिक्षित लोकांमध्ये होताना दिसत नाही. आज अशा आदिवासींच्या कृतींचे व मानवी मूल्यांचे जतन करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले.

अकोले तालुक्यात 22 श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र असून ती संख्या 51 वर न्यायची आहे. त्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे. श्री स्वामी सेवा मार्गात अशक्य काही नाही. भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे हे महाराजांचे अभिवचन दुखीत माणसाला बळ देऊन जाते. श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या चार भिंतींना मंदिर न म्हणता केंद्र म्हटले जाते कारण हे केंद्र म्हणजे दोन पायांच्या गाड्यांचे रिपेअर करण्याचे गॅरेज आहे. इथे सेवा करणार्यांना सेवेकरी म्हटले जाते. हे सेवेकरी पद अढळ असून ते उच्चत्तम पद आहे.रोज 11 माळी जप व स्वामी चरित्राचे तीन अध्याय वाचन करणारा खरा सेवेकरी आहे. केंद्रात कोणतीही अंधश्रद्धा नाही,कोणताही भेदभाव नाही.सरकारने महिलांना 33 टक्क्यावरून 50 टक्के आरक्षण दिले मात्र या मार्गात महिलांना 100 टक्के आरक्षण व संरक्षण दिलेले आहे. गुरूंची विचारधारा सर्व सामान्य माणसापर्यंत पोहोचले पाहिजे. त्यासाठी केंद्र वाढविणे गरजेचे आहे.
गुरुपुत्र चंद्रकांत दादा मोरे यांनी या सेवाकेंद्रामार्फत मानवी कल्याणासाठी 18 विभागाच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या ग्रामविकास अभियानाची सविस्तर माहिती दिली. त्यात शेती ही विषमुक्त ,सेंद्रिय शेती शेतकऱ्यांनी करावी असा सल्ला दिला. तसेच सर्व गुरुप्रणालीची माहिती देताना श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या जन्मापासून ते स्वयंभू स्वरूप असून त्यांनी शिष्य जंगली महाराज, गजानन महाराज, साईबाबा, शंकर महाराज, गुलाब बाबा घडविले असून ते वेगवेगळ्या ठिकाणी आपले कार्य करीत असल्याची माहिती दिली व त्यानंतर सदगुरु पिठले महाराज, सद्गुरु मोरेदादा आणि आता प.पू.गुरुमाऊली हे स्वामी समर्थ स्वरूपात कार्यरत आहे. यावेळी त्यांनी अकोले तालुक्यातील एका शेतमजुराला आलेला अनुभव कथन केला.व गुरुविषयी श्रद्धाआणि विश्वास असेल तर जीवनात काहीही अशक्य नाही असे सांगत जेथे सर्व असमर्थ तेथे श्री स्वामी समर्थ हा संदेश दिला. यावेळी सुंदर व प्रभावीपणे सुत्रसंचालन सौ.तळेकर यांनी केले. शेवटी राष्ट्र गीताने मेळाव्याची सांगता झाली व सर्व उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.